नोंदणी क्रमांक : MAHMAR/2021/82132 | पाने : ४ | वर्ष : ४थे | अंक : १८२ | किंमत : ४ रूपये
Gmail : aklgavakari@gmail.com
Gmail : punegavkari@gmail.com




महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक
# समर्थ गांवकरी
संपादक : डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे
POSTAL REGISTRATION NO : SRP/137/2023-2026




मंगळवार, दि. ०९ जून २०२६
मुंबई, अहमदनगर, पुणे, नाशिक, जळगाव, धुळे, नंदुरबार, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, पालघर, सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, औरंगाबाद, बीड, नांदेड, परभणी, हिंगोली, लातूर, बुलढाणा, अमरावती, अकोला, नागपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, यवतमाळ, वर्धा, येथून एकाच वेळी प्रकाशित होणारे दैनिक

# बैठकीसाठी राष्ट्रवादीचा वर्धापनदिन पुढे ढकलला

## सुनेत्रा पवार, तटकरे-पटेल दिल्लीला जाणार

**मुंबई : (स. गांवकरी)**

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा यंदाचा 27 वा वर्धापन दिन सोहळा एक दिवस पुढे ढकलण्यात आला आहे. दरवर्षी 10 जून रोजी साजरा केला जाणारा हा पक्षीय सोहळा आता गुरुवार, 11 जून रोजी दुपारी 2 वाजता मुंबईतील किंग्ज सर्कल येथील षण्मुखानंद सभागृहात आयोजित करण्यात आला आहे. नवी दिल्लीत एनडीएची महत्त्वाची बैठक आयोजित करण्यात आल्यामुळे हा बदल करण्यात आला असल्याची माहिती राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष खासदार सुनील तटकरे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची स्थापना 10 जून 1999 रोजी झाली होती. मात्र या वर्षी 10 जून रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिल्लीत एनडीए घटक पक्षांची तातडीची बैठक बोलावली आहे. या राष्ट्रीय बैठकीला देशभरातील एनडीएचे सर्व प्रमुख घटक पक्ष, त्यांचे मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री आणि खासदार उपस्थित राहणार आहेत. महायुती आणि एनडीएचा एक भाग म्हणून या बैठकीला उपस्थित राहणे अत्यंत आवश्यक असल्यानं, राष्ट्रवादी काँग्रेसच्या राष्ट्रीय अध्यक्षा आणि महाराष्ट्राच्या उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, खासदार प्रफुल्ल पटेल आणि सुनील तटकरे हे 10 जून रोजी दिल्लीत असणार आहेत.

देशातील जनतेने सलग तिसऱ्यांदा नरेंद्र मोदी आणि एनडीएला देशसेवेची संधी दिली आहे. जगभरात युद्धाचे सावट असतानाही भारताने केलेली प्रगती आणि एनडीए सरकारच्या मागील दोन वर्षांच्या पूर्ततेचा आढावा या बैठकीत घेतला जाईल. तसेच एनडीएच्या भक्कम एकसंघ



वाटचालीचे मंथन या बैठकीत होणार आहे, अशी माहिती राष्ट्रवादीचे सुनील तटकरे यांनी दिली.

दिल्लीतील बैठक पूर्ण करून सर्व नेते परतल्यानंतर, 11 जून रोजी दुपारी 2 वाजता षण्मुखानंद सभागृहातच हा सोहळा होईल. केवळ तारखेत बदल झाला असून जागा तीच आहे, हे तटकरे यांनी स्पष्ट केलं.

माजी उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या दुर्दैवी निधनानंतर पक्ष पहिल्यांदाच आपला वर्धापन दिन साजरा करत आहे. अजित पवारांच्या निधनानंतर अतिशय संयमाने आणि धिरोदत्तपणे पक्षाची धुरा सांभाळत सुनेत्रा पवारांनी राष्ट्रीय अध्यक्षपद आणि राज्याच्या उपमुख्यमंत्रिपदाची सूत्रे हाती घेतली आहेत. हा वर्धापन दिन 'दादांना समर्पण... संघर्ष आणि संकल्प' या विचाराने साजरा केला जाणार असल्याची माहिती सुनील तटकरे यांनी सांगितली.

संघटनात्मक मजबुतीबाबत बोलताना सुनील तटकरे म्हणाले की, "पक्षाला सन 2029 च्या आगामी मोठ्या आव्हानांना एनडीए म्हणून सामोरं जायचं आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या 50 टक्के आरक्षणाच्या निर्णयानंतर, राज्यातील प्रलंबित जिल्हा परिषद निवडणुका ऑक्टोबर-नोव्हेंबर दरम्यान होण्याची शक्यता आहे. या पार्श्वभूमीवर राष्ट्रीय अध्यक्षा सुनेत्रा पवार यांचा राज्यव्यापी दौरा नियोजित करण्यात येत आहे. पक्षाची संघटनात्मक बांधणी बूथ पातळीपासून ते देश पातळीपर्यंत मजबूत करण्याला आणि पक्ष विस्ताराला आमचे सर्वोच्च प्राधान्य असेल."

## अभियंत्यांचे अपुरे ज्ञान अमृतकाळ रस्ते विकास योजनेच्या मुळावर!

**मुंबई : (स. गांवकरी)**

रस्ते किंवा पुलांच्या कामांकरिता वन जमिनींचे संपादन करताना पाळावे लागणारे कायदे, नियम-अधिनियम, सूचना आदींचा गृहपाठ करण्यात अभियंते कच्चे पडत असल्याने सार्वजनिक बांधकाम विभागाची रस्ते विकासाची कामे रखडत आहेत. यावर तोडगा म्हणून वन क्षेत्रातील कामांचा अनुभव असलेल्या विभागातील अभियंत्यांची समिती नेमण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. राज्यात जवळपास तीन लाख किलोमीटरपेक्षा जास्त लांबीचे रस्ते आहेत. त्यात अमृतकाळ रस्ते विकास योजनेची भर पडून २०२५-४७ या काळात रस्त्यांचे जाळे अधिकाधिक मजबूत केले जाणार आहे. या योजनेद्वारे राज्यातील औद्योगिक दळणवळण, पर्यटन, वारसा स्थळे इत्यादी जोडण्याकरिता रस्त्यांचे मोठ्या प्रमाणावर काँक्रिटीकरण केले जाईल. जे रस्ते वन विभागातून जातात, त्यांचा विकास करताना विविध नियम-अधिनियमांचे पालन करावे




लागते. काम वेळेत पूर्ण होऊन, प्रकल्पाचा खर्च वाढू नये म्हणून अभियंत्यांनी वन जमिनींचे संपादन करण्याकरिता लागणाऱ्या कायदेशीर परवानग्यांचे नियोजन बांधकाम सुरू होण्यापूर्वीच करणे महत्त्वाचे असते. परंतु, किचकट कायदे, वेळेचे बंधन आणि योग्य समन्वयाचा अभाव यामुळे मोठे प्रकल्प रखडतात. क्षेत्रीय अभियंत्याना वन (संवर्धन) अधिनियमां'च्या अभ्यासाअभावी या समस्या उद्भवत असल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे सार्वजनिक बांधकाम विभागाने वनक्षेत्रातील कामांचा पुरेसा अनुभव असलेले नागपुरचे संभाजी माने यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमण्याचा निर्णय घेतला आहे.

## थोडक्यात...

### महायुतीच्या नेत्यांमध्ये जुगलबंदी

अमरावती (स. गांवकरी) : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची बढती होऊन ते केंद्रात जावेत आणि मुख्यमंत्रीपद एकनाथ शिंदे यांना मिळावे अशी इच्छा शिवसेना शिंदे गटाचे आमदार बच्चू कडू यांनी व्यक्त केल्यानंतर त्यावर महायुतीच्या नेत्यांकडून प्रतिक्रिया व्यक्त होत आहेत. याविषयी महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनीही आपली प्रतिक्रिया व्यक्त करताना अशा चर्चांना फारसे महत्त्व देऊ नये, समन्वय समितीत जे ठरले, त्याचा विचार झाला पाहिजे, असे मत व्यक्त केले आहे. राज्य सरकार नेहमीच शेतकऱ्यांच्या पाठीशी उभे असून, राज्यातील शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी इतिहासातील सर्वात मोठी कर्जमाफी देण्यात आली असल्याची माहिती चंद्रशेखर बावनकुळे यांनी येथे प्रसारमाध्यमांशी संवाद साधताना दिली. बावनकुळे म्हणाले, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या नेतृत्वाखालील महायुती सरकारने सुमारे ३६ हजार कोटी रुपयांची कर्जमाफी करून निवडणूक जाहीरनाम्यातील आश्वासन पूर्ण केले आहे.

### अशी स्वच्छता असते का? : सुनेत्रा पवार

बारामती (स. गांवकरी) : उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी बारामती येथील पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शासकीय रुग्णालयाला अचानक भेट दिली. या भेटीदरम्यान आरोग्य सेवांचा प्रत्यक्ष आढावा घेत रुग्णालयातील विविध विभागांना भेट देत रुग्णांना मिळणाऱ्या सुविधा, रुग्णालयातील स्वच्छतेची स्थिती, औषधांचा पुरवठा आणि रुग्णालयातील एकूण व्यवस्थापनाची माहिती सुनेत्रा पवार यांनी घेतली. यावेळी उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी रुग्णालयातील रुग्णांची आणि त्यांच्या नातेवाईकांशी देखील संवाद साधत त्यांच्या अडचणी आणि तेथील समस्या जाणून घेतल्या. या भेटीदरम्यान सुनेत्रा पवार यांनी कामात हलगर्जीपणा करणाऱ्या काही कर्मचाऱ्यांना चांगलंच झापलं आहे. रुग्णालयात काही ठिकाणी अस्वच्छता दिसून आल्याने सुनेत्रा पवार यांनी रुग्णालय प्रशासनाच्या अधिकाऱ्यांची आणि कर्मचाऱ्यांची खरडपट्टी काढली. दरम्यान, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी बारामतीमधील पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शासकीय रुग्णालयाला अचानक भेट दिल्याचा व्हिडीओ देखील समोर आला आहे. या व्हिडीओमध्ये रुग्णालयातील अस्वच्छता पाहून सुनेत्रा पवार तेथील कर्मचाऱ्यांवर चांगल्याच संतापल्या असल्याच पाहायला मिळत आहे . "अशी स्वच्छता असते का? दिवसभर तुम्ही काय काम करता? फक्त मोबाईल पाहता का?", अशा शब्दांत सुनेत्रा पवार यांनी रुग्णालयातील कर्मचाऱ्यांना झापलं आहे.

# महावितरणच्या समभाग विक्री प्रक्रियेला वेग

*समभाग विक्रीची प्रकिया पारदर्शकपणे राबवावी, वीज कामगार संघटनांची मागणी*




**मुंबई : (स. गांवकरी)**

### महावितरण खासगी भांडवदारांच्या घशात

निविदेच्या माध्यमातून कंपनीचे ७०टक्क्यांहून अधिक भाग भांडवल विकले जाईल. यातून कोट्यवधीची मालमत्ता असलेली संपूर्ण महावितरण कंपनी विशिष्ट खासगी भांडवलदारांच्या घशात घातली जाणार आहे. सरकारच्या या धोरणामुळे महावितरणमध्ये कार्यरत असलेले हजारो अधिकारी व कर्मचारी यांच्या नोकऱ्या अडचणीत येणार आहेत. या विरोधात वीज क्षेत्रातील अन्य संघटनांना सोबत घेऊन मोठे आंदोलन उभे करण्यात येईल.

**– राकेश जाधव, प्रवक्ते, इंटक.**

महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी लिमिटेडला (एमएसईडीसीएल-महावितरण) आर्थिक संकटातून बाहेर काढण्याकरिता कंपनीच्या समभाग विक्रीकरिता शेअर बाजारात सूचिबद्ध करण्याच्या प्रयत्नांना वेग आला आहे. परंतु, महावितरण ही सरकारी कंपनी तोट्यात नसून समभाग विक्रीची प्रक्रिया पारदर्शकपणे राबविण्यात यावी, अशी मागणी वीज कामगार संघटनांनी राज्याचे मुख्यमंत्री आणि ऊर्जामंत्री म्हणून देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे. महाराष्ट्रातील कोट्यवधी ग्राहकांना वीज पुरवठा करणाऱ्या या कंपनीने आपल्या प्रस्तावित प्रारंभिक समभाग विक्रीसाठी (आयपीओ) 'बुक रनिंग लीड मॅनेजर्स' (मर्चंट बँकर्स) आणि कायदेशीर सल्लागारांच्या नियुक्तीची प्रक्रिया सुरू केली असून यासाठी रीतसर प्रस्ताव मागणी (आरएफपी) निविदा प्रसिद्ध केली आहे. महावितरणच्या आयपीओ प्रक्रियेचे व्यवस्थापन करण्यासाठी आणि कायदेशीर बाबी हाताळण्यासाठी तज्ज्ञ संस्थांची निवड केली जाणार आहे. केवळ अनुभवी, सेबी नोंदणीकृत मर्चंट बँकर्स आणि नामांकित कायदेविषयक कंपन्या या प्रक्रियेत सहभागी होऊ शकतील. संपूर्ण बोली प्रक्रिया महावितरणच्या अधिकृत ई-टेंडरिंग पोर्टलद्वारे राबवली जात आहे. कर्जाचे ओझे कमी करण्यासाठी कंपनीचे विभाजन करून आयपीओ आणण्याचा निर्णय राज्याच्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला होता. शेतकऱ्यांवरील हजारो कोटींच्या थकीत विजबिलामुळे कंपनी आर्थिक संकटात आहे. मात्र ही प्रक्रिया राबविताना सध्या कंपनीचे भाग भांडवल किती कोटी रूपयांचे आहे, यातील किती कोटी रूपये भाग भांडवलाची बाजारात विक्री केली जाणार आहे, याचा खुलासा करण्याची मागणी महाराष्ट्र राज्य राष्ट्रीय वीज कामगार फेडरेशनने (इंटक) केली आहे. कारण, एका मर्यादेपेक्षा जास्त भाग भांडवल आयपीओच्या माध्यमातून विक्रीस काढले तर महावितरणवर खासगी भांडवलदारांचे मालकी हक्क निर्माण होतील, अशी भिती कामगारांना आहे.

# अहिल्यानगर महापालिका अधिकाऱ्यांवर गुन्हे दाखल करण्याची आमदार संग्राम जगताप यांची मागणी

**अहिल्यानगर : (स. गांवकरी)**

महापालिकेत सत्ताधारी असलेल्या राष्ट्रवादी काँग्रेसचे (अजित पवार गट) आमदार संग्राम जगताप यांनीच महापालिकेच्या कारभाराबद्दल संतप्त भावना व्यक्त करत अधिकाऱ्यांवर गुन्हे दाखल करण्याची मागणी राज्य सरकारकडे करणार असल्याचे सांगितले. महापालिकेच्या नगररचना विभागाच्या हलगर्जीपणामुळे विकासकामात अडथळे निर्माण होत आहेत. शहरातील ओढे-नाल्यांवर अतिक्रमण करणाऱ्यांना अधिकाऱ्यांकडून प्रोत्साहन मिळत आहे. या अधिकाऱ्यांची राज्य सरकारकडे तक्रार



करून त्यांच्यावर गुन्हे दाखल करण्याची मागणी करणार असल्याचे त्यांनी सांगितले. आमदार जगताप म्हणाले, शहरातील विकास आराखड्यातील रस्त्यांच्या कामासाठी १५० कोटी रुपयांचा निधी मंजूर करून आणला. काही रस्त्यांची कामे प्रलंबित आहेत तर काही रस्त्यांची कामे अर्धवट आहेत. नागरिकांना त्याचा त्रास सहन करावा लागतो. महापालिकेच्या नगररचना विभागाने वेळेत रेखांकन करून देणे व अतिक्रमण विभागाने अडथळे देऊन दूर करणे गरजेचे असतानाही संबंधित विभागाकडून हलगर्जीपणा होत आहे.






## थोडक्यात पण महत्वाचे



### अशोक कांडेकर यांचा अध्यक्ष भगवानराव पाचपुते यांच्या हस्ते सन्मान

श्रीगोंदा (स. गांवकरी) : काष्टी येथील स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेच्या नवभारत माध्यमिक विद्यालय, आनंदवाडी (गणेशा) येथील विद्यार्थिनी कु. वेदिका दिगांबर नलवडे हिने दहावीच्या परीक्षेत गणित विषयात १०० पैकी १०० गुण मिळवत उल्लेखनीय यश संपादन केले. या यशामागे मार्गदर्शन करणारे गणित विषयतज्ञ शिक्षक अशोक कांडेकर यांचा संस्थेचे अध्यक्ष भगवानराव (आबा) पाचपुते यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. यावेळी बोलताना अध्यक्ष भगवानराव (आबा) पाचपुते यांनी सांगितले की, संस्थेच्या शाळांनी गुणवत्तापूर्ण निकालाची परंपरा कायम राखली असून ग्रामीण भागातील विद्यालये असतानाही विद्यार्थ्यांनी शैक्षणिक गुणवत्तेत आघाडी कायम ठेवली आहे. भविष्यातही ही यशस्वी परंपरा अधिक जोमाने सुरू ठेवावी, असे आवाहन त्यांनी केले. या कार्यक्रमास संस्थेचे विश्वस्त ॲड. प्रताप पाचपुते, नवभारत माध्यमिक विद्यालय आनंदवाडीचे मुख्याध्यापक सुनील गिरमकर, मुख्याध्यापक रविंद्र पवार, मुख्याध्यापक शिवाजी उदार, नामदेव सोनटक्के, सुजाता दिवेकर, राहुल साळवे, जालिंदर कोळेकर, सुशांत शिंदे यांच्यासह शिक्षक व मान्यवर उपस्थित होते.




### उज्वल भविष्यासाठी पर्यावरणाचे रक्षण करा – पल्लवी जगताप

श्रीगोंदा तालुका (स. गांवकरी) : दिवसेंदिवस वातावरणात होत असलेल्या बदलांमुळे पर्यावरणाचा समतोल ढासळत चालला असून भविष्यासाठी हा गंभीर इशारा आहे. हा धोका कमी करण्यासाठी पर्यावरणाचे संवर्धन आणि संरक्षण करणे ही प्रत्येकाची जबाबदारी आहे. उज्वल भविष्यासाठी प्रत्येकाने पर्यावरणाचे रक्षण करावे, असे आवाहन सामाजिक वनीकरण विभागाच्या वनपरिक्षेत्र अधिकारी ॲड. पल्लवी जगताप-उंडे यांनी केले. जागतिक पर्यावरण दिनानिमित्त गुरुवारी (दि. ५) श्रीगोंदा तालुक्यातील भानेश्वर विद्यालय व ज्युनिअर कॉलेज, भाणगाव येथे सामाजिक वनीकरण विभाग, श्रीगोंदा यांच्या वतीने वृक्षारोपण करून पर्यावरण दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी वनपरिक्षेत्र अधिकारी ॲड. पल्लवी जगताप-उंडे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना, "या पावसाळ्यात संकल्प करू, प्रत्येकाने एक तरी झाड लावू. पर्यावरणाचे करा रक्षण, उज्वल भविष्याचे हेच धोरण," असा संदेश दिला. तसेच "झाडे लावा, झाडे जगवा" या उपक्रमात सक्रिय सहभाग घेण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी भानेश्वर विद्यालय व ज्युनिअर कॉलेजचे प्राचार्य विश्वनाथ शेलार यांचे मोलाचे सहकार्य लाभले. कार्यक्रमास मोठ्या संख्येने विद्यार्थी व शिक्षक उपस्थित होते. याप्रसंगी एच. टी. गारुडकर (वनपाल), एस. आर. निलाखे (वनरक्षक), डी. बी. तोरडमल (वनरक्षक) आणि व्ही. एम. बनसोडे (वनरक्षक) यांच्यासह वन विभागाचे अधिकारी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या शेवटी वन विभागाच्या वतीने विद्यार्थ्यांना अल्पोपहार देण्यात आला. प्राचार्य विश्वनाथ शेलार यांनी उपस्थितांचे आभार मानले.

### एसएसआय मंत्रा रोबोटिक सिस्टिमचा विश्वविक्रम




पुणे (स. गांवकरी) : भारताच्या प्रगत रोबोटिक तंत्रज्ञानाने आणि भारतीय डॉक्टरांच्या कौशल्याने पुन्हा एकदा संपूर्ण जगाला थक्क केले आहे. प्रख्यात हृदय शल्यचिकित्सक डॉ. सुधीर श्रीवास्तव यांनी गयानामध्ये बसून भारतातील इंदूर येथे असलेल्या रुग्णाच्या हृदयावर यशस्वी रोबोटिक टेली-सर्जरी करून वैद्यकीय इतिहासात नवा विश्वविक्रम प्रस्थापित केला आहे. सुमारे २०,००० किलोमीटर अंतरावरून करण्यात आलेली ही शस्त्रक्रिया जगातील आतापर्यंतची सर्वात लांब अंतरावरील रोबोट-सहाय्यित हृदय टेली-सर्जरी मानली जात आहे. ही ऐतिहासिक प्रक्रिया गयानातील जॉर्जटाउन पब्लिक हॉस्पिटल कॉर्पोरेशन (GPHC) आणि भारतातील IRCAD इंडिया, इंदूर यांच्यामध्ये यशस्वीपणे पार पडली. या यशाची सर्वात महत्त्वाची बाब म्हणजे ही शस्त्रक्रिया पूर्णपणे भारतात विकसित करण्यात आलेल्या एसएसआय मंत्रा सर्जिकल रोबोटिक सिस्टम च्या सहाय्याने करण्यात आली.

### बिगर शेती परवान्याच्या कामात ३५ लाखांची फसवणूक

- बनावट कागदपत्रांचा आरोप; वाघोली पोलिस ठाण्यात तक्रार

वाघोली (स. गांवकरी) : हवेली तालुक्यातील केसनंद येथील शेतकरी बाबासाहेब तुकाराम हरगुडे यांनी बिगर शेती (एन.ए.) परवाना मिळवून देण्याच्या नावाखाली तब्बल ३५ लाख रुपयांची फसवणूक झाल्याची तक्रार वाघोली पोलिस ठाण्यात दाखल केली आहे. संबंधित प्रकरणात बनावट कागदपत्रांचा वापर करून शासकीय यंत्रणेची दिशाभूल केल्याचाही आरोप करण्यात आला आहे. तक्रारदार बाबासाहेब हरगुडे यांच्या म्हणण्यानुसार, मौजे केसनंद (ता. हवेली, जि. पुणे) येथील गट क्रमांक १७२ मधील जमीन बिगर शेती करण्यासाठी तसेच आवश्यक शासकीय मंजुरी, ना-हरकत दाखले आणि इतर परवानग्या मिळविण्याचे काम सुरुवातीला आर्किटेक्ट अमित आव्हाळे यांच्याकडे सोपविण्यात आले होते. त्यानंतर अरुण दत्तात्रय गायकवाड यांनी संपर्क साधून परिसरातील अनेक प्रकरणे यशस्वीरीत्या पूर्ण केल्याचा दावा करत संबंधित काम स्वतःकडे घेतले. गायकवाड यांनी सदर प्रकरण अंतिम टप्प्यात असून फाईल पीएमआरडीए कार्यालयात विचाराधीन असल्याचे सांगून तक्रारदाराचा विश्वास संपादन केला. तक्रारदार शेती व दुग्ध व्यवसायात व्यस्त असल्याने त्यांनी संपूर्ण प्रक्रिया गायकवाड यांच्याकडे सोपविली. त्यानुसार वेळोवेळी रोख रक्कम व धनादेशाद्वारे पैसे देण्यात आल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. तक्रारीनुसार, संबंधित कागदपत्रे अरुण गायकवाड यांनी स्वतःच्या नावाने अर्ज करून केसनंद येथील गाव कामगार तलाठी शुभम वाबळे यांच्याकडे पडताळणीसाठी सादर केली होती. कागदपत्रांची तपासणी करताना गंभीर त्रुटी व संशयास्पद बाबी आढळल्याने हे प्रकरण पुढील चौकशीसाठी अप्पर तहसीलदार तृप्ती कोलते यांच्याकडे पाठविण्यात आले. अप्पर तहसीलदारांनी सखोल चौकशी करून संबंधित कागदपत्रे भूमी अभिलेख विभागाकडे पडताळणीसाठी पाठविली.

# शिवराज्याभिषेक सोहळा जिल्हा परिषद ठाणे येथे उत्साहात साजरा

## छत्रपती शिवाजी महाराजांच्या विचारांचा आदर्श घेऊन लोकाभिमुख प्रशासन उभारूया – मुख्य कार्यकारी अधिकारी रणजित यादव

ठाणे : (स. गांवकरी)



हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांच्या राज्याभिषेक दिनानिमित्त जिल्हा परिषद ठाणे येथे आज, दि. ०६ जून, २०२६ रोजी शिवस्वराज्य दिन मोठ्या उत्साहात व प्रेरणादायी वातावरणात साजरा करण्यात आला. महाराष्ट्र शासनाच्या निर्देशानुसार आयोजित या कार्यक्रमात छत्रपती शिवाजी महाराजांच्या पराक्रम, दूरदृष्टी आणि लोककल्याणकारी प्रशासनाच्या कार्याचा गौरव करण्यात आला.

६ जून १६७४ रोजी रायगड किल्ल्यावर छत्रपती शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक झाला. स्वराज्य, स्वाभिमान, लोककल्याण आणि सुशासनाची मुहूर्तमेढ रोवणाऱ्या या ऐतिहासिक घटनेच्या स्मरणार्थ राज्यभर शिवस्वराज्य दिन साजरा करण्यात येतो. त्याच अनुषंगाने जिल्हा परिषद ठाणे येथे विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमाची सुरुवात मुख्य कार्यकारी अधिकारी रणजित यादव यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून तसेच छत्रपती शिवाजी महाराज आणि राजमाता जिजाऊ यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. यानंतर मानाची स्वराज्य गुढी उभारून तिचे पूजन करण्यात आले. उपस्थित अधिकारी व कर्मचाऱ्यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेस अभिवादन करून त्यांच्या कार्याला आदरांजली वाहिली. यावेळी राष्ट्रगीत व राज्यगीताचे सामूहिक गायन करण्यात आले. शिक्षक रविंद्र तरे आणि सहशिक्षक यांनी पोवाडा गायन केले तसेच "जय भवानी, जय शिवाजी" आणि "छत्रपती शिवाजी महाराज की जय" अशा घोषणांनी संपूर्ण परिसर दुमदुमून गेला. कार्यक्रमादरम्यान शिवचरित्रातील विविध पैलूंवर प्रकाश टाकण्यात आला.

यावेळी मार्गदर्शन करताना मुख्य कार्यकारी अधिकारी रणजित यादव म्हणाले, "छत्रपती शिवाजी महाराजांनी लोककल्याण, न्याय, पारदर्शकता आणि सुशासन यांचे जे आदर्श निर्माण केले, ते आजही प्रशासनासाठी प्रेरणादायी आहेत. सर्वसामान्य जनतेच्या हिताला सर्वोच्च प्राधान्य देणारी राज्यकारभाराची संकल्पना महाराजांनी प्रत्यक्षात उतरविली.

त्यांच्या विचारांचा आदर्श घेऊन नागरिकाभिमुख, पारदर्शक आणि जबाबदार प्रशासन उभारण्यासाठी आपण सर्वांनी प्रयत्नशील राहिले पाहिजे. शिवराज्याभिषेक दिन हा केवळ ऐतिहासिक स्मृतीदिन नसून सुशासन, कर्तव्यनिष्ठा आणि राष्ट्रभक्तीची प्रेरणा देणारा दिवस आहे." यावेळी त्यांनी उपस्थित सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांना शिवस्वराज्य दिनाच्या शुभेच्छा देत आपल्या कार्यातून समाजहित साध्य करण्याचे आवाहन केले. कार्यक्रमास उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन) अविनाश फडतरे, मुख्य लेखा व वित्त अधिकारी वैजनाथ बुरडकर, कार्यकारी अभियंता (बांधकाम विभाग) पद्माकर लहाने, शिक्षणाधिकारी (प्राथमिक) बाळासाहेब राक्षे, शिक्षणाधिकारी (माध्यमिक) देविदास महाजन, समाज कल्याण विभाग प्रमुख उज्वला सपकाळे, कार्यक्रम अधिकारी शोभा शेलार, अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. दिनेश सुतार यांच्यासह सर्व विभागप्रमुख, अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अनिल सूर्यवंशी यांनी केले.

उपस्थितांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या कार्याचा आदर्श जीवनात आणि प्रशासकीय कामकाजात अंगीकारण्याचा संकल्प यावेळी व्यक्त केला.

## एन. के. टी. जाजरमान बँक्वेट हॉलची पाहणी; लवकरच उद्‌घाटन!

अंजार : (स. गांवकरी)



अंजार येथील नव्याने उभारण्यात आलेल्या एन. के. टी. जाजरमान बँक्वेट हॉलची नुकतीच मान्यवरांच्या उपस्थितीत पाहणी करण्यात आली. या वेळी सभागृहाचे उद्घाटन लवकरच करण्याचा निर्णय घेण्यात आला. बैठकीत अंजार लोहाणा बोर्डिंगच्या इयत्ता दहावीमध्ये १०० टक्के निकाल मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्याबाबत चर्चा व विचारविनिमय करण्यात आला. तसेच बोर्डिंगच्या देणगीदारांची नावे ग्रॅनाइटच्या फलकावर कोरण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला. याप्रसंगी श्री. नानजीभाई खिमजीभाई ठक्कर (ठाणावाला), डॉ. साधू, श्री. प्रभुभाई ठक्कर, श्री. नटवरलाल ठक्कर, श्री. वसंतभाई कोडराणी, श्री. वैभवभाई कोडराणी, श्री. पिंटू ठक्कर, श्री. पिंटू चंदे तसेच गावातील अनेक ग्रामस्थ उपस्थित होते. सभागृहाची पाहणी केल्यानंतर उपस्थितांनी समाधान व्यक्त केले. हे सभागृह कोणत्याही समाज, जात, भाषा अथवा धर्माचा भेदभाव न करता सर्वांसाठी खुले राहणार असून विविध सामाजिक, सांस्कृतिक व कौटुंबिक कार्यक्रमांसाठी उपलब्ध असेल. सभागृहाच्या बुकिंगसाठी पिंटू चंदे व गोविंदभाई यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले. दरम्यान, डी. व्ही. हायस्कूलजवळ उभारण्यात येत असलेल्या मुख्य प्रवेशद्वाराचे काम सध्या सुरू असून हे प्रवेशद्वार धनलक्ष्मीबेन नानजीभाई ठक्कर (ठाणावाला) यांच्या वतीने बांधण्यात येणार आहे. पुढील १५ दिवसांत या कामाचे भूमिपूजन करण्यात येणार असल्याची माहिती देण्यात आली.

दुर्गादेवी मंदिराच्या १४ व्या वर्धापन दिनानिमित्त

# वैदू समाजाचा भव्य मेळावा

- डॉ. स्वामी शिरकुल यांचा सत्कार!

सोलापूर : (स. गांवकरी)



वैदूवाडी, सोलापूर येथे दुर्गादेवी मंदिराच्या १४ व्या वर्धापन दिनानिमित्त भव्य धार्मिक व सामाजिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमास वैदू समाजासह परिसरातील विविध समाज बांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थिती दर्शविली. कार्यक्रमास शहर उत्तरचे आमदार विजयकुमार देशमुख, सोलापूर महानगरपालिकेच्या स्थायी समिती अध्यक्षा रंजिता चाकोते, जीएम ग्रुपचे संस्थापक बाळासाहेब वाघमारे, भाजप शहराध्यक्षा रोहिणी तडवळकर, नगरसेवक गौतम कसबे, संजय कनके, आरपीआयचे सरचिटणीस के.डी. मामा कांबळे, रयत क्रांती संघटनेचे सोलापूर जिल्हाध्यक्ष अमोल वेदपाठक, दत्तात्रय बडगु, तलरेजा शेठजी आदी मान्यवर प्रमुख उपस्थित होते.

यावेळी अखिल महाराष्ट्र वैदू समाजाच्या अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल डॉ. स्वामी शिरकुल यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. उपस्थित मान्यवरांनी त्यांचे अभिनंदन करून पुढील सामाजिक कार्यासाठी शुभेच्छा दिल्या. वैदू समाजाच्या संघटनात्मक बळकटीसाठी आणि समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी डॉ. शिरकुल यांच्या नेतृत्वाखाली चांगले कार्य घडेल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी दुर्गादास शिरकुल, मारुती दासरी, अनिल वरगंटी, तायप्पा शिवराळ, जितेश जवळकर, गुरु वरगंटी, बुदेप्पा शिरकुल, लिंगप्पा गुडील, सुरज शिरकुल, राजेंद्र शिरकुल, राजू हुंडेकरी, रवी अलकुंटे, राघव, गणेश बंडगर यांच्यासह अनेक कार्यकर्त्यांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमास वैदू समाजातील नागरिकांसह विविध समाजातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. धार्मिक, सामाजिक आणि संघटनात्मक एकतेचा संदेश देणारा हा कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला.

## कुलदैवत दर्शन, विकासकामांची पाहणी आणि पाणी परब योजनेचा आढावा!

बेला : (स. गांवकरी)



बेला येथे कुलदैवताच्या दर्शनासाठी तसेच गावातील विविध विकासकामांची पाहणी करण्यासाठी मान्यवरांनी भेट दिली. या भेटीदरम्यान गावातील परिस्थितीचे निरीक्षण करण्यात आले तसेच बांधकामाधीन भव्य सभागृहाच्या कामाचा आढावा घेण्यात आला.

कमलादेवी मंदिर परिसरात आयोजित कार्यक्रमात श्री. नानजीभाई खिमजीभाई ठक्कर (ठाणावाला), डॉ. साधू, श्री. प्रभुभाई ठक्कर, श्री. नटवरलाल ठक्कर, श्री. वसंतभाई कोडराणी, श्री. वैभवभाई कोडराणी, श्री. पिंटू ठक्कर, श्री. पिंटू चंदे तसेच गावातील अनेक ग्रामस्थ उपस्थित होते.

यावेळी मंदिर परिसरातील उपलब्ध सुविधा, व्यवस्थापन व्यवस्था आणि सुरू असलेल्या विकासकामांची प्रत्यक्ष पाहणी करण्यात आली. तसेच बांधकामाधीन भव्य सभागृहाच्या कामाची प्रगती, उपलब्ध सुविधा आणि भविष्यातील नियोजन याविषयी सविस्तर माहिती घेण्यात आली. गावाच्या सर्वांगीण विकासासाठी तसेच धार्मिक आणि सामाजिक स्थळांच्या उन्नतीसाठी अशा भेटी महत्त्वपूर्ण ठरत असल्याचे उपस्थितांनी नमूद केले.

या भेटीदरम्यान धनलक्ष्मीबेन नानजीभाई ठक्कर यांच्या वतीने सुरू करण्यात आलेल्या पाणी परब योजनेची देखील पाहणी करण्यात आली. योजनेच्या माध्यमातून नागरिकांना स्वच्छ व शुद्ध पिण्याचे पाणी उपलब्ध करून देण्याचे कार्य सुरू असून त्याच्या देखभाल, व्यवस्थापन आणि भविष्यातील विस्ताराबाबत चर्चा करण्यात आली. स्थानिक पदाधिकारी आणि जबाबदार व्यक्तींना योजनेची अधिक प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी आवश्यक मार्गदर्शन करण्यात आले.

याशिवाय, या योजनेचा लाभ अधिकाधिक नागरिकांपर्यंत पोहोचावा यासाठी आवश्यक उपाययोजना करण्याचे आवाहन करण्यात आले. समाजहिताच्या दृष्टीने राबविण्यात येणाऱ्या या उपक्रमाचे उपस्थितांनी कौतुक केले.

कार्यक्रमादरम्यान डॉ. साधू तसेच त्यांचे व्याही राववाला मेयर साहेब यांचाही विशेष सन्मान करण्यात आला. शाल, नारळ आणि पुष्पगुच्छ देऊन त्यांचे स्वागत करण्यात आले. भेटीदरम्यान उपस्थित सर्वांनी परिसरातील शांत, निसर्गरम्य आणि प्रसन्न वातावरणाचा अनुभव घेतला. अद्याप हा परिसर जंगल भागासारखा असला तरी समाजातील विविध घटकांच्या सहकार्याने तेथे आवश्यक सुविधा निर्माण करण्याचे काम सातत्याने सुरू असल्याचे नमूद करण्यात आले. समाजाच्या एकजुटीमुळे आणि योगदानामुळे या ठिकाणाचा होत असलेला विकास समाधानकारक असल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली. गावाच्या धार्मिक, सामाजिक आणि पायाभूत विकासासाठी अशा उपक्रमांमुळे नवी ऊर्जा मिळत असून भविष्यातही विविध लोकहितकारी प्रकल्प राबविण्याचा संकल्प यावेळी व्यक्त करण्यात आला.

## २४ तास सुरू राहणार दुकाने व आस्थापने

पुणे : (स. गांवकरी)




भारतीय जनता पार्टी व्यापारी आघाडी - पुणे शहरचे अध्यक्ष महेश गुप्ता यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला मोठे यश मिळाले असून, पुणे शहरातील व्यापारी वर्गाच्या विविध प्रश्नांबाबत महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आले आहेत. यामुळे व्यापाऱ्यांमध्ये निर्माण झालेला संभ्रम दूर होण्यास मदत होणार आहे. यासंदर्भात पुणे पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांच्या अध्यक्षतेखाली व्यापारी संघटनांची विशेष समन्वय बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीला सह पोलीस आयुक्त संजय दराडे, अपर पोलीस आयुक्त तेजस्वी सातपुते, महेश गुप्ता तसेच विविध व्यापारी संघटनांचे पदाधिकारी आणि प्रतिनिधी उपस्थित होते. बैठकीत दुकाने व आस्थापनांच्या वेळांबाबत निर्माण झालेला संभ्रम, शहरातील विविध भागांमध्ये नियमांची होत असलेली वेगवेगळी अंमलबजावणी, व्यापाऱ्यांशी सन्मानपूर्वक वर्तन तसेच व्यापारी आणि पोलिस प्रशासन यांच्यातील समन्वय वाढविण्याच्या विषयांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. यावेळी पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी स्पष्ट केले की, सर्व अधिकृत व परवानाधारक दुकाने आणि आस्थापने यांना कायद्यानुसार २४ तास व्यवसाय सुरू ठेवण्याची परवानगी आहे.

## धनलक्ष्मीबेन नानजीभाई ठक्कर यांच्या वतीने चबुतऱ्याचे बांधकाम

वाव (मुंद्रा) : (स. गांवकरी)

मुंद्रा तालुक्यातील वाव गावामध्ये समाजोपयोगी उपक्रमांतर्गत नव्या चबुतऱ्याच्या बांधकामास प्रारंभ करण्यात आला असून येत्या चार दिवसांत या कामाचे भूमिपूजन होणार आहे. हा चबुतरा धनलक्ष्मीबेन नानजीभाई ठक्कर (ठाणावाला) यांच्या वतीने उभारण्यात येत आहे. मिळालेल्या माहितीनुसार, भूमिपूजनाचा कार्यक्रम श्री. प्रभुभाई ठक्कर यांच्या हस्ते संपन्न होणार असून या प्रकल्पामुळे गावाच्या सौंदर्यात भर पडण्यासोबतच ग्रामस्थांसाठी एक उपयुक्त सार्वजनिक सुविधा उपलब्ध होणार आहे. सदर चबुतऱ्याचे बांधकाम पूर्ण करण्यासाठी आवश्यक ठेका देण्यात आला असून अंदाजे दोन महिन्यांच्या कालावधीत हे काम पूर्ण होईल, अशी माहिती यावेळी देण्यात आली. बांधकामाच्या गुणवत्तेकडे विशेष लक्ष देण्याच्या सूचना संबंधितांना करण्यात आल्या आहेत. या प्रसंगी श्री. नानजीभाई खिमजीभाई ठक्कर (ठाणावाला), डॉ. साधू, श्री. प्रभुभाई ठक्कर, श्री. नटवरलाल ठक्कर, श्री. वसंतभाई कोडराणी, श्री. वैभवभाई कोडराणी, श्री. पिंटू ठक्कर, श्री. पिंटू चंदे तसेच गावातील अनेक ग्रामस्थ उपस्थित होते. उपस्थितांनी या उपक्रमाचे स्वागत करत गावाच्या विकासासाठी अशा लोकहितकारी कामांची आवश्यकता असल्याचे मत व्यक्त केले. समाजातील दानशूर व्यक्तींच्या सहकार्यामुळे ग्रामीण भागात विविध सुविधा निर्माण होत असून वाव गावातील हा चबुतरा त्याचे उत्तम उदाहरण ठरणार असल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.

## धनलक्ष्मीबेन नानजीभाई अन्नक्षेत्राला मान्यवरांची भेट

चिरई : (स. गांवकरी)



### महिला सक्षमीकरणाच्या कार्याचे कौतुक!

चिरई येथे दिनांक ४ जून २०२६ रोजी धनलक्ष्मीबेन नानजीभाई अन्नक्षेत्राला समाजसेवक श्री. नानजीभाई खिमजीभाई ठक्कर (ठाणावाला) तसेच साध्वी माता कबीर आश्रम यांच्या उपस्थितीत भेट देण्यात आली. या भेटीदरम्यान अन्नक्षेत्र आणि आश्रमामार्फत राबविण्यात येणाऱ्या सामाजिक उपक्रमांची माहिती घेण्यात आली.

यावेळी बोलताना श्री. नानजीभाई ठक्कर यांनी साध्वी भगिनींच्या कार्याचे कौतुक करताना सांगितले की, "तुम्ही साध्वी भगिनी आहात. 'मातृदेवो भव' या संस्कारामुळे समाजाला आधार मिळतो आणि मंदिरासारखे पवित्र वातावरण निर्माण होऊ शकते." समाजात महिलांच्या सन्मानासाठी आणि त्यांच्या संरक्षणासाठी अशा उपक्रमांची आवश्यकता असल्याचेही त्यांनी नमूद केले. कबीर आश्रमामध्ये कोणत्याही महिला अथवा मुलीला अडचण, संकट किंवा अन्य कोणताही त्रास असल्यास त्यांना विनामूल्य आश्रय दिला जातो. गरजू महिलांना सुरक्षित वातावरण उपलब्ध करून देणे आणि त्यांना मानसिक आधार देणे हा आश्रमाचा मुख्य उद्देश आहे. याच समाजोपयोगी हेतूने धनलक्ष्मीबेन अन्नक्षेत्राची स्थापना करण्यात आली असून येथे गरजूंसाठी भोजनाची व्यवस्था करण्यात येते. महिलांना त्यांच्या कुटुंबामध्ये छळ, वाद किंवा इतर कौटुंबिक समस्या उद्भवल्यास त्यांच्यात समेट घडवून आणण्याचे प्रयत्न आश्रमामार्फत केले जातात. तसेच परिस्थिती अनुकूल असल्यास संबंधित महिलांना पुन्हा त्यांच्या कुटुंबात सन्मानाने परत पाठविण्यासाठीही प्रयत्न केले जात असल्याची माहिती यावेळी देण्यात आली. या प्रसंगी श्री. नानजीभाई खिमजीभाई ठक्कर (ठाणावाला), डॉ. साधू, श्री. प्रभुभाई ठक्कर, श्री. नटवरलाल ठक्कर, श्री. वसंतभाई कोडराणी, श्री. वैभवभाई कोडराणी, श्री. पिंटू ठक्कर, श्री. पिंटू चंदे तसेच गावातील अनेक ग्रामस्थ उपस्थित होते. उपस्थितांनी अन्नक्षेत्र व कबीर आश्रमामार्फत सुरू असलेल्या समाजहिताच्या कार्याचे कौतुक करत अशा सेवाभावी उपक्रमांना समाजाने अधिकाधिक सहकार्य करावे, असे मत व्यक्त केले.

# समाज सेवेतील झुझार नेतृत्व - राजु पाटील शिंपाळकर

(स. गांवकरी)

पत्रकार- सय्यद रियाज -बिलोली मो. नं. 8983344468

माणूस हा पैसा किंवा पदामुळे मोठा होत नाही तर त्यांच्या विचाराच्या उंचीमुळे कार्याच्या व्यापकतेमुळे व समाजासाठी केलेल्या निस्वार्थ सेवेमुळे जनमानसात तो मोठा ठरतो. असाच एक कर्तत्ववान जनसेवेला सर्वोच्च स्थान देणारा समाज सेवक म्हणुन ज्यांच्याकड आज एका आदर्श नजरेने बघितल जात आसे विविध पुरस्काराने सन्मानित झालेले बहुगुणी समाज सेवेतील झुंझार नेतृत्व बिलोलीचे जेष्ठ पत्रकार राजु पाटील शिंदे शिंपाळकर यांचा जन्म बिलोली तालुक्यातील बालाघाटाच्या डोंगर पायथ्याशी वसलेल्या मौ.शिंपाळ या ग्रामिण भागातील शेतकरी कुटुंबात झाला.

ग्रामिण भागातील सामान्य शेतकरी कुटुंबातील जन्मजातीमुळे अंगी साकारलेली कामाची जिद्द, चिकाटी, दुरदृष्टी, संघर्षाची तागद यामुळे शेतकरी शेतमजुर,कामगार वर्गासह गावखेड्यातील जनतेच्या समस्याच्या नाड्या ना नाडयांची चांगलीच जाण असल्या कारणाने शालेय जिवना पासून म्हणजे जवळपास चार दशका पुर्वी पासुन राजु पाटील यांच्या ह्दयात जनसेवेचा एक प्रेरणादायी प्रवास रुजलेला आसल्या कारणाने ते पदवित्तोर शिक्षणाचा प्रवास पूर्ण करून आपल्या आवडी.. निवडी प्रमाणे लोकशाहीचा चौथा स्तंभ म्हणुन समाज ज्याकडे आशेच्या नजरेन बघितल जात या पत्रकारीतेच्या क्षेत्रामध्ये गेल्या पंधरा वर्षापूर्वी पदार्पण करून आपल्या लेखणीच्या माध्यमातुन शेतकरी,शेतमजुर, निराधार,अपंग,अशा विविध वंचित घटकांना न्याय मिळवुन देण्याचा त्यांचा सातत्यांचा प्रयत्न व या माध्यमातून जनसेवेचे स्थान मजबुत करण्यांचा ही प्रयत्न अल्पावधितच सफल ठरला.

शेतकरी कुटुंबाचा वारसा व विद्याविभुषीत ज्ञान वृत्तीमुळे शेतकऱ्यांच्या न्याय हक्काच्या प्रश्नावर अनेक वेळा उपोषण, आंदोलन विविध चळवळीच्या माध्यमातुन अतिवृष्टी नुकसान असो या गारपीट असो किंवा पीक विम्याचा प्रश्न असो शेतकऱ्यांच्या प्रश्नासह बिलोली, देगलुर सिमावर्ती भागाच्या विकासासाठी उभारलेली चळवळ आसेल यासह विविध वंचित घटकांच्या प्रश्नावर शासन व प्रशासन स्तरावर सातत्याने पाठपुरावा करून अडचणीत सापडलेल्या घटकांना वेगवेगळ्या संघर्षातुन न्याय मिळवुन दिल्यांची अनेक उदाहरणे आज नजरे आड करुन चालणार नाही.

पत्रकारितेच्या माध्यमातुन सामाजिक कार्य करीत आसताना महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे बिलोली तालुका ते नांदेड जिल्हा अध्यक्ष पदाची धुरा सांभाळत आसताना काही महिण्या पुर्वी पदन्नोती होऊन पत्रकार संघांच्या मराठवाडा उपाध्यक्ष पदाची महत्वपुर्ण जबाबदारी सोपविण्यात आली.तसेच या बरोबर अखिल भारतीय भ्रष्टाचार निर्मुलन संघर्ष समितीचे राष्ट्रीय सरचिटणीस पदावर काम करण्यांची जबाबदारी देखील सध्या ते पार पाडत आहेत.



त्यांच्या या एकंदरीत विविध कार्याची दखल घेऊन ओबीसी फाउंडेशन मुंबईच्या वतीने महाराष्ट्र रत्न पुरस्कार तर महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या वतीने राज्यस्तरीय नवचेतना पुरस्कार, महात्मा कबीर समता परिषदेच्या वतिने नांदेड रत्न पुरस्कार अखिल भारतीय भ्रष्टाचार निर्मूलन समितीच्या वतीने सरदार वल्लभाई पटेल समाज भूषण पुरस्कार, डॉक्टर विठ्ठलराव विखे पाटील कृषी पुरस्कार, मिमांसा फाउंडेशन व महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाच्या वतीने प्रेरणादायी पुरस्कार यासह तालुका,जिल्हा, राज्य व राष्ट्रीय पातळीवरील अनेक पुरस्काराने ते सन्मानित झाले आहेत.

आजचा दिवस हा केवळ एका व्यक्तीचा वाढदिवस नसुन समाजासाठी कार्यरत असलेल्या कर्तृत्ववान जनप्रिय व्यक्तिमत्त्वाचा गौरव दिवस आहे.आजच्या या मंगल दिनी आपण आशा एका नेतृत्वाचा गौरव करत आहोत ज्यांनी आपल्या अफाट कार्यक्षमतेने जनसेवेच्या वसाहतीने समाजात एक आगळे वेगळे स्थान निर्माण केले आहे.जनहिताची निष्ठा बाळगत गरवंताच्या हाकेला मदतीची साथ देण्यासाठी वेळोवेळी धावुन येणारा अवलिया जनसेवक अनेक लोकांच्या ह्दयात रुजलेला आसुन जनतेच्या समस्यांचे त्यांचे प्रयत्न समाजाच्या प्रगतीची प्रामाणिक निस्वार्थ भावना पाहता जनतेच्या मनात त्यांच्या बद्दल आसलेले आदर, प्रेम आणि विश्वास निर्माण झाला आहे.

त्यांच्या कर्तृत्वाने जोडलेला विस्तारीत जनसागर व जिवा भावाचा मित्र परिवार तसेच राजकीय, सामाजिक अशा विविध क्षेत्रासह प्रशासनातील अधिकाऱ्यांशी निर्माण केलेले आपुलकीचे स्थान अशा या बहुगुणी व्यक्तीमत्त्वाच्या वाढदिवसा निमित्त त्यांना निरोगी अरोग्य, उदंड दीर्घायुष्य व अखंड काम करण्याची ऊर्जा लाभो हीच ईश्वर चरणी प्रार्थना त्यांचा समाज सेवेचा प्रवास भविष्यातही असाच प्रेरणादायी आणि यशस्वी राहो हीच मनःपूर्वक सदिच्छा.

## थोडक्यात पण महत्वाचे



### जागतिक पर्यावरण दिनानिमित्त एपीएमसी पोलीस ठाण्यात वृक्षारोपण

नवी मुंबई (स. गांवकरी) : जागतिक पर्यावरण दिनानिमित्त एपीएमसी पोलीस ठाणे, नवी मुंबई येथे वृक्षारोपण कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला. पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यासाठी आयोजित करण्यात आलेला हा उपक्रम मा. पोलीस आयुक्त आणि मा. पोलीस उपायुक्त यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडला. एपीएमसी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक यांच्या नेतृत्वाखाली पोलीस ठाण्याच्या आवारात विविध प्रकारच्या वृक्षांची लागवड करण्यात आली. यावेळी पर्यावरण संरक्षण, हरित परिसर निर्मिती आणि भविष्यातील पिढ्यांसाठी स्वच्छ व निरोगी वातावरण निर्माण करण्याच्या उद्देशाने वृक्षारोपणाचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले. कार्यक्रमात उपस्थित पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांनी वृक्षांचे संगोपन करण्याची आणि पर्यावरण संवर्धनासाठी सक्रिय योगदान देण्याची प्रतिज्ञा केली. वाढते प्रदूषण आणि बदलते हवामान लक्षात घेता वृक्षारोपण ही काळाची गरज असल्याचे यावेळी नमूद करण्यात आले. या उपक्रमामुळे पोलीस ठाण्याच्या परिसरात हरित वातावरण निर्माण होण्यास मदत होणार असून पर्यावरण संरक्षणाबाबत जनजागृती करण्यासाठी अशा उपक्रमांचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले.



### छ. शिवाजी महाराज यांच्या शिव राज्याभिषेक सोहळा दिन उत्साहात साजरा

नवीन नांदेड (स. गांवकरी) : छत्रपती शिवाजी महाराज यांच्या राज्यभिषेक सोहळा दिन निमित्ताने 6 जुनं रोजी हडको येथील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास अभिषेक व पुष्पहार घालून, ढोलताशांच्या गजरात,फटाक्यांची आतिषबाजी व जयघोष करीत लोकप्रतिनिधी सर्व पक्षीय पदाधिकारी,विविध प्रतिष्ठानचे व्यापारी, डॉक्टर,पत्रकार यांच्या उपस्थितीत मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला ,यावेळी मिठाईचे वाटप करण्यात आले तर शिवंश राजे ताटे यांच्या हस्ते महाभिषेक पुजन करण्यात आले. शिवराज्याभिषेक सोहळा दिनानिमित्त 6 जुनं रोजी हडको येथील छत्रपती शिवाजी महाराज पुतळा येथे सकाळी 10 वाजता कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते, यावेळी परिसरातील नगरसेवक संजय पाटील घोगरे, वैजनाथ देशमुख, नगरसेवक प्रतिनीधी राजु लांडगे,सतिश बसवदे माजी नगरसेवक संजय इंगेवाड,देविदास बसवदे,जिवनराव शिंदे,डॉ.अशोक कलंत्री,डॉ.नरेश रायेवार,डॉ.विजयानंद भोग, डॉ.अशोक भिसे,साहेबराव गाढे,भगवानराव ताटे,टि.एम.मोरे, जयवंतराव काळे,प्रशांत कदम, सुभाष सुर्यवंशी,गोविंद जाधव ,शंकर पाटील घोरबांड, गोविंद मजरे, संतोष मुळे, महेश घोगरे,नामदेव पवळे, आनंदराव गायकवाड, संदीप कदम, डॉ.राहुल वाघमारे,गजानन शिंदे, विनोद कांचनगिरे,सुदर्शन कांचनगिरे, एस.टी.मोरे भुजंग मोरे,पिंटु महाराज धिरज स्वामी,प्रमोद मैड,जितेश कोटलवार,पोलीस अमंलदार मारोती माने यांच्या सह राजकीय, सामाजिक व विविध संघटना,पत्रकार यांची मोठ्या संख्येने उपस्थित होते. सुत्रसंचलन डि.गा. पाटील यांनी केले.

### "दहा वर्षांचा वाद मिटला! जुनी भेंडी ते काळा खडक बंद रस्ता अखेर खुला

कळवण (स. गांवकरी) : कळवण तालुक्यातील मौजे जुनी भेंडी ते काळा खडक या मार्गावरील गेल्या तब्बल दहा वर्षांपासून बंद असलेला वहिवाट रस्ता अखेर पुन्हा खुला करण्यात आला असून, या महत्त्वाच्या प्रश्नावर कळवणचे तहसीलदार रोहिदास वारुळे साहेब यांनी वादमुक्त संवाद घडवून आणत सामंजस्याचा आदर्श निर्माण केला आहे. गेल्या अनेक वर्षांपासून बंद असलेल्या या रस्त्यामुळे परिसरातील शेतकऱ्यांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत होते. शेतीच्या कामांसाठी ये-जा, माल वाहतूक, जनावरे ने-आण तसेच दैनंदिन कामकाजात शेतकऱ्यांना पर्यायी मार्गांचा वापर करावा लागत असल्याने आर्थिक व मानसिक त्रास सहन करावा लागत होता. अनेकदा हा प्रश्न तणावाचे कारण बनण्याची शक्यता होती; मात्र प्रशासनाच्या संयमी भूमिकेमुळे हा विषय शांततेत मार्गी लागला. कळवणचे तहसीलदार वारुळे साहेब यांनी संबंधित शेतकरी, स्थानिक नागरिक व महसूल प्रशासन यांच्यात प्रत्यक्ष संवाद साधून गैरसमज दूर करण्याचे काम केले. "वादाऐवजी संवाद" या भूमिकेतून सर्व पक्षांना एकत्र आणत कुठलाही संघर्ष किंवा कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण न होता बंद असलेली वहिवाट खुली करण्यात आली.

## "एक पेड़ माँ के नाम" उपक्रमातून पर्यावरण संवर्धनाचा संदेश

कळवण, नाशिक : (स. गांवकरी)

कळवण तालुक्यात माजी केंद्रीय आरोग्य राज्यमंत्री व भाजप नेत्या डॉ भारतीताई पवार यांच्या दौऱ्यादरम्यान विविध गावांना भेटी देत प्रलंबित विकासकामांची पाहणी करण्यात आली. याचबरोबर ६ जून जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून तालुक्यात विविध ठिकाणी वृक्षारोपण कार्यक्रम उत्साहात पार पडला. देशाचे पंतप्रधान Narendra Modi यांनी दिलेल्या "एक पेड़ माँ के नाम" या भावनिक व प्रेरणादायी आवाहनाला प्रतिसाद देत कळवण तालुक्यात पर्यावरण संवर्धनाचा संदेश देणारे उपक्रम राबविण्यात आले. माननीय डॉ. भारतीताई पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत नाकोडे आसरा माता मंदिर परिसर, रवळजी तसेच देसराने येथे हिरे परिवाराच्या वतीने स्वर्गीय आईंच्या स्मरणार्थ आदर्शवत वृक्षारोपण करण्यात आले. या उपक्रमातून पर्यावरण रक्षणाबरोबरच "आईच्या स्मृती जपत निसर्गाचे संवर्धन" हा सामाजिक संदेश देण्यात आला. वाढते तापमान, पावसातील अनियमितता आणि पर्यावरणीय असंतुलनाच्या पार्श्वभूमीवर वृक्षारोपण ही काळाची गरज असल्याचे मत उपस्थितांनी व्यक्त केले.



दरम्यान, डॉ. भारतीताई पवार यांनी तालुक्यातील विविध भागांमध्ये भेटी देत विकासकामांचा आढावा घेतला. प्रलंबित कामे तातडीने मार्गी लावण्यासाठी संबंधितांशी चर्चा करत स्थानिक प्रश्न जाणून घेतले. त्यांच्या दौऱ्यामुळे भाजप कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते.

## अमरनाथ ग्रुपच्यावतीने वृक्षांना टँकरद्वारे जलाभिषेक

नेवासा : (स. गांवकरी)

पर्यावरण दिनानिमित्त नेवासा येथील सामाजिक कार्यात अग्रेसर असलेल्या मॉर्निंग वॉक अमरनाथ ग्रुपच्या वतीने देवगड रस्त्यावर लावलेल्या शेकडो वृक्षांना टँकरद्वारे पाणी देऊन जलाभिषेक घालण्यात आला.अमरनाथ ग्रुपचे प्रमुख नंदकुमार पाटील यांच्या संकल्पनेतून हा उपक्रम राबविण्यात आला.



सदर उपक्रमामध्ये नेवासा कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती व अमरनाथ ग्रुपचे मार्गदर्शक नंदकुमार पाटील,वृक्ष संवर्धन समितीचे व्यवस्थापक रामनाथ जाधव,रविंद्र जोशी,मेजर अरुण धनक,दिलीप जगदाळे, युनायटेड इन्शुरन्स कंपनीचे विकास अधिकारी किशोर गारुळे,व्यापारी शशिकांत नळकांडे,माजी नगरसेवक अंबादास ईरले,शंभूराजे जंगले, पत्रकार सुधीर चव्हाण,नगरसेवक जालिंदर गवळी, इंजिनिअर शंकर ओहोळ, व्यापारी राजेंद्र महाजन, मूर्तिकार बजरंग ईरले,ज्ञानेश्वर ऊगले,बँक मॅनेजर चंद्रकांत काटे,सुरेश शिंदे यांनी सहभाग नोंदवला.

सामाजिक कार्यात अग्रेसर असलेल्या अमरनाथ ग्रुपने वतीने खडका रस्त्यावरील देवगडकडे जाणाऱ्या रस्त्यावर विविध प्रकारची सुमारे दीडशे वृक्ष दोन वर्षांपूर्वी लावण्यात आलेली आहे,कडक उन्हाळयात देखील या वृक्षांचे संगोपन करण्याचे काम ग्रुपच्या वतीने करण्यात आले. वृक्ष संवर्धनाबरोबरच गोशाळेला शेड देणे,आरोग्य शिबिर,रक्तदान शिबिर,गरजू विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप,स्वच्छता अभियान असे समाजपयोगी उपक्रम अमरनाथ ग्रुपच्या वतीने राबविण्यात आले आहे. जळीत झालेल्या आपत्तीग्रस्त व्यावसायिकांना निधी देऊन हातभार लावण्याचा प्रयत्न केला आहे.झालेल्या वृक्ष संवर्धनासाठी जागतिक पर्यावरण दिनी राबविण्यात आलेल्या वृक्ष जलाभिषेक उपक्रमाचे अनेकांनी कौतुक करून अमरनाथ ग्रुपला धन्यवाद दिले.

## म्युझिकल स्टुडिओ, स्वर सम्राटच्या उद्घाटन प्रसंगी चैतन्याचे वातावरण




ठाणे : (स. गांवकरी)

मुंबई सारख्या वातावरणात आणि त्यात ही धकाधकीच्या अत्यंत धावपळीच्या जीवनात कलावंतांना आपल्या कलेला वाव मिळण्या साठी संगीत क्षेत्रातून मुंबई तील बऱ्याच ठिकाणी कुठल्या ना कुठल्या माध्यमातून रसिकांचे प्रयत्न चालूच असतात. म्हणून बऱ्याच वर्षा पासून गीत संगीत विषयाला जीवनाचा घटक बनविणारे बदलापूर चे सर्व गायक गायिकाना घेऊन संस्थापक किसनजी तामस्वरे ह्यांनी स्वर सम्राट कराओके आणि लाईव्ह सिंगिंग म्युझिकल स्टुडिओ. चा शुभारंभ सदाबहार रसिकांच्या उपस्थितीत संपन्न केला. बऱ्याच वर्षापासून कलावंतां साठी हा उपक्रम चालू असून परत नव्याने बदलापूर पूर्वेला बहारदार जुन्या नवीन गीतांना नजराणा घेऊन, गायक गायिकांची उपस्थिती लाभली होती. खरोखर नवचैतन्या चे वातावरण या ठिकाणी बहरले होते. या कार्यक्रमाला प्रमुख उपस्थिती म्हणून मराठी चित्रपटाचे निर्माता,निर्देशक, गीतकार ज्यांचा माया ममता,हा चित्रपट लवकरच पडद्यावर साकारणार आहे, ते वाघ साहेब आणि प्रोडक्शन मॅनेजर लक्ष्मण इंगले साहेब उपस्थित होते. जीवनात अपूर्ण राहिलेल्या आशा आकांक्षांना पूर्ण करण्याचं मानस डोळ्या समोर ठेवून स्वर सम्राट ची निर्मिती किसनजी तामस्वरे साहेब यांनी केलेली आहे. म्युझिक डायरेक्टर सिद्धार्थ मोहिते सर यांच्या सोबत गायकीचा ठसा उमटवणारे गायक, राज भिसे, सदानंद संसारे,दीपक कदम, विजय, किशोर केदारे,अनिल कुंभार,अरुण तांबे, महिला गायिकांमध्ये सुजाता वाकडे, बबीता भिसे, निशाजी मॅडम, नम्रता अंबवणे,सह कलाकार कोमल गायकवाड अंजली जी पुजारी आणि विजय हातेकर यांचा सहभाग या कार्यक्रमाला चैतन्याची शोभा वाढवणारा ठरत होता. किसनजी तामस्वरे आणि सर्व कलावंतांनी मिळून नटरंग, सरस्वती च्या पूजा आराधने नंतर प्रथमता प्रमुख पाहुण्यांचे स्वागत केले. ज्याला ज्या विषयाची अपेक्षा असेल त्या विषयातील प्रत्येक रसिक हा आशे वरतीच जीवन जगत असतो,आणि आज ना उद्या प्रयत्नशील माणसांची आशा ही पूर्ण होतच असते या शब्दांमध्ये निर्माता वाघ साहेब यांनी या लोकांचे कौतुक केले. सोबतच एक सामान्य माणूस चित्रपट बनवत असून चित्रपट,माया ममता ला आपण सर्वांनी भरभरून आशीर्वाद द्यावा अशी विनंती सुद्धा या वेळेस वाघ साहेब यांनी केली.

सोलो आणि ड्युएट गाण्यांची ही मेजवानी महिला वर्गाच्या सुमधुर आवाजाने, जुन्या काळातील संस्कृती व प्रतिभा संपन्न जुन्या गायक गायिकांची नक्कीच आठवण करून देत होता. कलावंत नवीन असतील किंवा जुन्या असतील त्या रसिकांना नक्कीच या स्वरसम्राटच्या माध्यमातून नवी आशा पूर्ण होण्यासाठी नवी दिशा उपलब्ध होईल.

ह्या शब्दात कौतुकास्पद उदगार ह्या उदघाटन प्रसंगी निर्माता वाघ साहेब ह्यांनी सर्व एक से बढकर एक गायक, गायिका आणि संस्थापक तामस्वरे साहेबांच्या स्टुडिओ ला शुभेच्छा प्रदान केल्या.तर सिद्धार्थ मोहिते सर आणि राज भिसे साहेबांनी आभार प्रदर्शन करून कार्यक्रम सांगता केली.

## "द विनर ऑर्बिट" या इंग्रजी पुस्तकाचे ऑनलाइन प्रकाशन

नांदेड : (स. गांवकरी)

हदगाव तालुक्यातील नाव्हा येथील रहिवासी तथा लातूर येथील राजर्षी शाहू महाविद्यालयातील इयत्ता अकरावीची विद्यार्थिनी विश्वश्री गंगाधर डवरे हिने अल्पवयातच " द विनर ऑर्बिट " हे प्रेरणादायी इंग्रजी पुस्तक लिहून उल्लेखनीय यश संपादन केले आहे. विशेष म्हणजे तिच्या वाढदिवसाचे औचित्य साधून १ जून २०२६ रोजी या पुस्तकाचे ऑनलाइन प्रकाशन करण्यात आले. लहानपणापासून वाचन, वक्तृत्व आणि प्रेरणादायी साहित्याची आवड असलेल्या विश्वश्रीला तिचे वडील प्राथमिक शिक्षक गंगाधर डवरे यांनी ऐतिहासिक कथा, महापुरुषांचे विचार आणि प्रेरणादायी प्रसंग यांची ओळख करून दिली. या प्रेरणेतूनच यश, सकारात्मक विचार, आत्मविश्वास आणि जीवनातील विजय यांवर आधारित " द विनर ऑर्बिट" हे पुस्तक साकार झाले.



सदर पुस्तकाचे प्रकाशन नेशन प्रेस या प्रकाशन संस्थेमार्फत करण्यात आले आहे. हे पुस्तक यशस्वी होण्याची आकांक्षा बाळगणाऱ्या प्रत्येक व्यक्तीसाठी प्रेरणादायी ठरणार आहे. व्यक्तीचे विचारच त्याची वास्तवता घडवतात आणि सकारात्मक मानसिकतेच्या बळावर यश कसे प्राप्त करता येते, याचे मार्गदर्शन या पुस्तकात करण्यात आले आहे. आजच्या स्पर्धात्मक युगातील 'रॅट रेस'मधून बाहेर पडून स्वतःच्या विजयाची कक्षा निर्माण करण्याचा संदेश या पुस्तकातून देण्यात आला आहे.

# जिल्हा परिषदेत शिवस्वराज्य दिन उत्साहात साजरा

नांदेड (स. गांवकरी)

छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेक दिनानिमित्त नांदेड जिल्हा परिषदेत आज शिवस्वराज्य दिन उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. यावेळी शिवरायांच्या लोककल्याणकारी, न्यायप्रिय आणि जनहितवादी प्रशासन व्यवस्थेचा आदर्श घेऊन शासनाच्या विविध विकास योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी अधिकारी व कर्मचाऱ्यांनी कटिबद्ध राहावे, असे आवाहन जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी केले.



कार्यक्रमास जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक मेघना कावली, पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक डॉ. संजय तुबाकले, उपमुख्य कार्यकारी अधिकारी राजकुमार मुक्कावार, मुख्य लेखा व वित्त अधिकारी महेश देशमुख यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी जिल्हाधिकारी राहुल कर्डिले व मुख्य कार्यकारी अधिकारी मेघना कावली यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला. तसेच गुढीपूजन व गुढी उभारणी करून शिवस्वराज्य दिन साजरा करण्यात आला. श्री चैतन्य इंग्लिश स्कूलच्या विद्यार्थ्यांनी राष्ट्रगीत व महाराष्ट्र गीत सादर करून कार्यक्रमाची सुरुवात केली.

यावेळी राहुल कर्डिले म्हणाले, छत्रपती शिवाजी महाराजांनी रयतेच्या कल्याणासाठी आदर्श प्रशासन उभे केले. शेतकऱ्यांना मदत, सिंचन व्यवस्थेचा विकास, न्याय्य कारभार आणि दूरदृष्टीपूर्ण नियोजन यामुळे त्यांचे राज्य लोकाभिमुख ठरले. प्रत्येक अधिकारी आणि कर्मचाऱ्याने आपल्या कामातून शिवरायांच्या प्रशासनाची मूल्ये जपली पाहिजेत, असेही ते म्हणाले.

कार्यक्रमात शाहीर रमेश गिरी आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी पोवाडे व शाहिरी सादर करून उपस्थितांना शिवचरित्राची प्रेरणादायी आठवण करून दिली. उपस्थित मान्यवरांचा शाल, पुस्तक आणि जिल्हा परिषदेचा लोगो असलेला स्मृतिचिन्ह कप देऊन सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. संजय तुबाकले यांनी केले. सूत्रसंचालन पद्माकर कुळकर्णी व मिलिंद व्यवहारे यांनी केले, तर आभार उपमुख्य कार्यकारी अधिकारी राजकुमार मुक्कावार यांनी मानले. यावेळी पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय विभागाचे जिल्हा उपायुक्त डॉ. एस. बी. खुणे, सहाय्यक आयुक्त डॉ. प्रविणकुमार घुले, शिक्षणाधिकारी वंदना फुटाणे, कृषी विकास अधिकारी डॉ. निलकुमार ऐतवडे, समाजकल्याण अधिकारी सत्येंद्र आऊलवार, कार्यकारी अभियंता राहुल रावसाहेब, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. संतोष सूर्यवंशी यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. छत्रपती शिवाजी महाराजांनी स्थापन केलेल्या हिंदवी स्वराज्याची संकल्पना ही लोककल्याण, न्याय, पारदर्शक प्रशासन, स्त्री सन्मान, पर्यावरण संवर्धन या मूल्यांवर आधारित होती, असे प्रतिपादन जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक मेघना कावली यांनी केले. आजच्या प्रशासन व्यवस्थेतही या मूल्यांचे महत्त्व कायम असून प्रत्येक अधिकारी व कर्मचाऱ्याने शिवरायांच्या कार्यातून प्रेरणा घेऊन जनतेच्या सेवेसाठी समर्पित भावनेने कार्य करावे, असे आवाहन त्यांनी केले. अनेक संकटांचा सामना करत छत्रपती शिवाजी महाराजांनी लोककल्याणकारी आणि न्यायाधिष्ठित राज्य उभे केले. आपल्या प्रजेवर कोणताही अन्याय होऊ नये यासाठी ते सदैव जागरूक राहिले. शासनाच्या माध्यमातून आपल्या वाट्याला आलेले कार्य प्रामाणिकपणे व जबाबदारीने पार पाडणे हीच शिवरायांना खरी आदरांजली ठरेल, असे प्रतिपादन पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांनी केले.



संकल्प असावेत
नवे तुमचे मिळाव्यात
त्यांना नव्या दिशा
प्रत्येक स्वप्न पूर्ण
व्हावे तुझेह्याच
वाढदिवसाच्या
शुभेच्छा:!

# मा. श्री. विनोद गायकवाड

## जिल्हाध्यक्ष, महा.रा.प.संघ, डिजी.मिडीया, अहिल्यानगर

यांना

# वाढदिवसानिमित्त

हार्दिक शुभेच्छा

**प्रदेश कार्यकारिणी सदस्य/ विभागीय अध्यक्ष**

शुभेच्छूक :-

सौ.सुरेखा खानोरे (सचिव), श्री.नितीन जाधव (मंत्रालय संपर्क प्रमुख),
श्री.नयन मोंढे (विदर्भ प्रमुख), श्री.सुनील फुलारी (अमरावती विभाग अध्यक्ष),
श्री.शैलेश पालकर (कोकण विभागीय अध्यक्ष), श्री.अनिल सावंत (मराठवाडा विभागीय अध्यक्ष),
श्री.अनुपकुमार भार्गव (नागपूर विदर्भ प्रमुख), श्री.भुवनेश दुसाने (उत्तर महाराष्ट्र अध्यक्ष),

श्री.प्रशांत कांबळे (मुंबई), श्री.सुरेश खोसे (अहिल्यानगर), श्री.स्वामीराज गायकवाड (सोलापूर),
श्री.संग्राम मोरे (नांदेड),
श्री.स्वामी शिरकुल (मुंबई), श्री.सुभाष विसे (ठाणे), श्री.बाजीराव फराकटे (कोल्हापूर),
श्री.अनिल रहाणे (अहिल्यानगर), कु.श्रध्दा ठोंबरे (बदलापूर), श्री.पराग कुंकूलोळ (पिंपरी चिंचवड),
श्री.लक्ष्मण डोळस (नाशिक), श्री.सिताराम गावडे (सिंधूदुर्ग), श्री.अरुण लोखंडे (तुळजापूर),
श्री.शरद नागदेवे (नागपूर), श्री.रुपेश पाडमुख (नांदेड), प्रभू गोरे,
श्री.सुभाष डोके (प्रदेश का. सदस्य), श्री.राजेंद्र कोर्टे पाटील (पंढरपूर),
श्री.कुंडलिक वाळेकर (औरंगाबाद),श्री.रवींद्र गुरव (नंदुरबार), श्री.अबरार मिर्झा (जळगाव),
श्री.संतोष खालकर (सातारा), श्री.पंकज सोनवणे (वाशिम), प्रा.जसपाल सिंह सिसोदिया (धुळे),
श्री.संजोग काळदंते (पश्चिम महाराष्ट्र सचिव), श्री.नाविद अहमद (हिंगोली), विकास कदम (सातारा)

महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ; मुंबई

महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ; मुंबई

संघटनेचे सर्व जिल्हा पदाधिकारी, तालुकाध्यक्ष व सभासद

# डॉ. श्री. विश्वासराव आरोटे

पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस तथा
दैं. स. गांवकरीचे संपादक





संस्थापक संघटक – मा.श्री.संजय भोकरे
राष्ट्रीय अध्यक्ष – मा.श्री.अशोकराव वानखेडे
प्रदेश अध्यक्ष – मा.श्री.निलेश सोमाणी
राज्य समन्वयक – श्री. नितीन शिंदे



सोशल मिडीया प्रदेश अध्यक्ष – श्री.सिध्दार्थ भोकरे
प्रदेश संपर्क प्रमुख – मा.श्री.वैभव स्वामी
इलेक्ट्रॉनिक मिडीया प्रदेश अध्यक्ष – श्री.अतुल परदेशी



आरोग्य सेल प्रदेश अध्यक्ष – मा.श्री.अमितकुमार खाडे
राज्य निवड समिती अध्यक्ष – मा.श्री.रुपेश पाडमुख
प्रवक्ते – मा.श्री.रमेश डोंगरे



सांस्कृतिक विभाग अध्यक्ष प्रदेश अध्यक्ष – श्री.संदिप भटेवरा
कायदेविषयक सल्लागार – ॲड.रचना भालके
प्रदेश प्रसिध्दी प्रमुख – मा.श्री.नवनाथ जाधव



श्री.रमजान मन्सुरी – गुजरात प्रदेश अध्यक्ष
श्री.मनिष महाजन – मध्यप्रदेश अध्यक्ष
राजश्री चौधरी – दिल्ली प्रदेश अध्यक्ष



श्री.आबा खवणेकर – गोवा प्रदेश संपर्क प्रमुख
श्री.रघुनाथ सोनवणे – दिल्ली प्रदेश संपर्क प्रमुख



मा.श्री.अशोक देढे – प्रदेश उपाध्यक्ष
मा.श्री.महेश पानसे – प्रदेश उपाध्यक्ष
मा.श्री.अभयकुमार दांडगे – प्रदेश उपाध्यक्ष
मा.श्री.किशोर रायसाकडा – प्रदेश उपाध्यक्ष

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे यांनी सोनेरी छत्रपती प्रिंटर्स, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक समर्थ गांवकरी कार्यालय, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. This newspaper is printed by owner, printer, publisher, editor Vishwasrao Anandrao Arote at Soneri Chhatrapati Printers, Near Bhingare Godown, Akole, Tq. Akole, Dist. Ahmednagar - 422601.
पुणे निवासी संपादक : प्रतिक गंगणे, मुंबई विभागीय संपादक : दशरथ चव्हाण, व्यवस्थापक : संजय फुलसुंदर कार्यकारी संपादक : नवनाथ जाधव, ॲड. रचना भालके (हायकोर्ट), ठाणे
पुणे विभागीय कार्यालय : फ्लॅट नं. ४०६, व्यंकटेश विश्व, अभिरूची परिसर समोर, पारे कंपनी रोड, नऱ्हे, पुणे – ४११०४१ / ठाणे विभागीय कार्यालय : A-1, भाग्यश्री छाया, बेसमेंट, आवाज रेडिओ जवळ, डेअरी कॉटेज, इदुलजी रोड, चाराई, ठाणे (वे.)

# अखंड हरिनाम सप्ताह आयोजन महाराष्ट्रातील नामवंत कीर्तनकारांची उपस्थिती

## शिवलीलामृत पारायण, प्रवचन, कीर्तन, पालखी सोहळा आणि महाप्रसादाचे आयोजन; पंचक्रोशीत भक्तिमय वातावरण

अधिक मासातील या पवित्र पर्वात अखंड हरिनाम सप्ताह, ग्रंथराज शिवलीलामृत पारायण, प्रवचन, कीर्तन, पालखी सोहळा आणि महाप्रसादाचा लाभ घेण्यासाठी अकोले तालुक्यासह पंचक्रोशीतील भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन देवस्थान ट्रस्ट व ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आले आहे.

लिंगदेव : (स. गांवकरी)

अकोले तालुक्यातील मुळा नदीच्या निसर्गरम्य काठावर वसलेले आणि पंचक्रोशीतील भाविकांचे श्रद्धास्थान म्हणून ओळखले जाणारे श्री क्षेत्र लिंगेश्वर देवस्थान, लिंगदेव येथे अधिक मासानिमित्त अखंड हरिनाम सप्ताह व ग्रंथराज शिवलीलामृत पारायण सोहळ्याचे भव्य आयोजन करण्यात आले आहे. मंगळवार (दि. ९ जून) ते शुक्रवार (दि. १२ जून) या कालावधीत होणाऱ्या या धार्मिक सोहळ्यामुळे संपूर्ण परिसर भक्तिरसात न्हाऊन निघणार असून भाविकांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे.



हिंदू धर्मशास्त्रात अधिक मासाला विशेष महत्त्व असून या महिन्याला पुरुषोत्तम मास म्हणून संबोधले जाते. या काळात जप, तप, दान, धर्म, पारायण, हरिनाम सप्ताह, भजन-कीर्तन आणि सत्संग यांना विशेष महत्त्व असते. अधिक मासात केलेली ईश्वरभक्ती अनेक पटींनी पुण्यदायी मानली जाते. त्यामुळे राज्यभर धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन केले जात असते. याच पार्श्वभूमीवर श्री क्षेत्र लिंगेश्वर देवस्थान येथे हा सप्ताह आयोजित करण्यात आला आहे.

सप्ताह काळात पहाटे ५ ते ६ या वेळेत श्री लिंगेश्वरांचा रुद्राभिषेक, सकाळी ७.३० ते ११ या वेळेत ग्रंथराज शिवलीलामृत पारायण व विष्णुसहस्रनाम स्तोत्र पठण, दुपारी भजन सेवा, गाथा भजन, सायंकाळी प्रवचन व हरिपाठ तसेच रात्री कीर्तन आणि जागर सेवा असे विविध धार्मिक कार्यक्रम होणार आहेत.

सप्ताहाच्या पहिल्या दिवशी कीर्तन केसरी ह.भ.प. विवेक महाराज केदार (अकोले) यांचे कीर्तन, ह.भ.प. प्रदीप महाराज होलगीर यांचे प्रवचन, तर हनुमान प्रासादिक भजनी मंडळ, सुगाव बुद्रुक यांची भजन सेवा होणार आहे. दुसऱ्या दिवशी शिवचरित्रकार ह.भ.प. शिवानंद महाराज पाटील यांचे कीर्तन, ह.भ.प. परशुराम महाराज कानवडे यांचे प्रवचन, भोलेश्वर प्रासादिक भजनी मंडळ, परखतपूर यांची भजन सेवा आणि वाघापूर ग्रामस्थांची जागर सेवा होणार आहे.

तिसऱ्या दिवशी हनुमान प्रासादिक भजनी मंडळ, शिरसगाव यांची भजन सेवा, सायंकाळी पालखी नगरप्रदक्षिणा आणि त्यानंतर वाणीभूषण ह.भ.प. एकनाथ महाराज चत्तर (पारनेर) यांचे कीर्तन होणार आहे. सप्ताहाच्या समारोपप्रसंगी स्वरअलंकार ह.भ.प. अनंत महाराज काळे (संगमनेर) यांचे काल्याचे कीर्तन रंगणार असून सप्ताहाची भक्तिमय सांगता होणार आहे.

या सप्ताहात मृदुंगाचार्य ह.भ.प. शांताराम महाराज पापळ, ह.भ.प. सचिन महाराज चौधरी, ह.भ.प. विनायक महाराज शेटे यांची संगीत साथ लाभणार आहे. तसेच गायनाचार्य ह.भ.प. शांताराम महाराज कोल्हाळ, ह.भ.प. अशोक महाराज लांडे, ह.भ.प. ज्ञानेश्वर महाराज बैरागी, ह.भ.प. भगवान महाराज बर्डे, ह.भ.प. गोविंद महाराज कदम, ह.भ.प. यादव महाराज हाडवळे, ह.भ.प. दत्तू महाराज शेळके, ह.भ.प. नारायण महाराज चौधरी, ह.भ.प. स्वप्नील महाराज चौधरी, ह.भ.प. एकनाथ महाराज बोऱ्हाडे, ह.भ.प. मारुती महाराज बोऱ्हाडे, ह.भ.प. अनिल महाराज रकटे आणि ह.भ.प. मनोज महाराज बैरागी यांची नामसेवा लाभणार आहे.

काकडा, हरिपाठ आणि भजन नेतृत्वासाठी ह.भ.प. बाळासाहेब महाराज हाडवळे, ह.भ.प. बाळासाहेब महाराज रंधे, ह.भ.प. निवृत्ती महाराज होलगीर, ह.भ.प. महेश महाराज फापाळे, ह.भ.प. रामभाऊ महाराज हाडवळे, ह.भ.प. भाऊसाहेब महाराज फापाळे, ह.भ.प. सार्थक महाराज फापाळे, ह.भ.प. रेवगडे ताई, ह.भ.प. कलाबाई खंडागळे आणि ह.भ.प. हिराबाई फापाळे सेवा देणार आहेत.

चोपदार म्हणून ह.भ.प. रखमाजी महाराज हाडवळे, ह.भ.प. आत्माराम महाराज पवार आणि ह.भ.प. भूषण महाराज कोरडे कार्यरत राहणार आहेत. सांगीतिक सहकार्यासाठी श्री लिंगेश्वर वारकरी शिक्षण संस्था, लिंगदेव व जोंधळे महाराज वारकरी शिक्षण संस्था, अकोले यांचे योगदान लाभणार आहे. विणेकरी म्हणून ह.भ.प. कारभारी महाराज कोरडे, ग्रंथराज ज्ञानेश्वर पारायण नेतृत्व ह.भ. दासकाका महाराज क्षीरसागर, हार्मोनियम साथ ह.भ.प. बबन नामदेव कावडे तर नंदादीप सहकार्य बन्शी म्हातारबा होलगीर व भाऊसाहेब भागा होलगीर यांनी दिले आहे. सप्ताहातील महाप्रसादासाठी गेनुभाऊ सखाराम कानवडे, किरण शेठ मिसाळ (सौभाग्य ज्वेलर्स), कै. कोंडाजी गेनू पवार स्मरणार्थ पवार परिवार, गणेश गंगाराम फापाळे, कारभारी बजरंग कानवडे, मनोहर कान्हू फापाळे, योगेश शेठ महाले, ऋषिकेश दगडू पवार, पंढरीनाथ लक्ष्मण फापाळे, बाळशिराम दगडू कानवडे, सीताराम भावका कातोरे, सुदाम शंकर फापाळे, बजरंग लक्ष्मण ढोकरे, गोपीनाथ कृष्णाजी आंबरे, संतू लक्ष्मण कानवडे, बाळासाहेब म्हातारबा होलगीर, जानकीराम भाऊ हाडवळे, गणेश सरुजी पवार, सुशांत फापाळे (माऊली मेडिकल), ठका भागाजी होलगीर, ज्ञानदेव लक्ष्मण कोल्हाळ, बाळासाहेब केरू घोमल, धोंडिभाऊ पुंजा कोरडे, गणपत रखमा फापाळे, आसिफ जाफर तांबोळी, डॉ. राजाराम येसू जाधव, राधाकिसन चिमाजी कोरडे, गोविंद यादव हाडवळे, सुनील शहा, सुजाता दत्तात्रय फापाळे, सुजाता दत्तू फापाळे, दत्तू महादू कानवडे, रामकृष्ण बाबुराव कानवडे, कैलास भागा फापाळे, बन्शी पोपट कानवडे, बाळशिराम नामदेव आढाव, निवृत्ती भाऊसाहेब आंबरे, डॉ. गणेश भास्कर होलगीर, ज्ञानेश्वर सोमदास बैरागी, भीमाशंकर गंगाधर कोरडे, पोपट कारभारी हाडवळे, एकनाथ रामभाऊ कानवडे, सुरेश गेनू कानवडे, पी. वाय. जाधव सर, मंदाकिनी भास्कर टर्नर, डॉ. प्रल्हाद देशमुख, भाऊसाहेब बाबुराव हाडवळे, सदाशिव भिमाजी कानवडे, हरिभाऊ मंजुळ फापाळे, दत्तू निवृत्ती फापाळे, कै. ताबाजी भिमाजी हांडे स्मरणार्थ हांडे परिवार, उत्तम बाळकृष्ण हाडवळे, एकनाथ कारभारी कोरडे, विठ्ठल बाळा होलगीर, बाळासाहेब किसन कानवडे आणि यमनाजी सावित्रा कानवडे यांनी उदार योगदान दिले आहे. या सप्ताहाच्या यशस्वी आयोजनासाठी देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष डी. बी. फापाळे, उपाध्यक्ष दत्तू माधव कानवडे, सचिव पंढरीनाथ येसू जाधव, सहसचिव रामकृष्ण बाबुराव कानवडे, खजिनदार एकनाथ रामभाऊ कानवडे, विश्वस्त उत्तम बाळकृष्ण हाडवळे, एकनाथ कारभारी कोरडे, कैलास भागा फापाळे, दत्तू निवृत्ती फापाळे, निवृत्ती भाऊसाहेब आंबरे, बन्शी पोपट कानवडे, बाळशिराम नामदेव आढाव, भाऊसाहेब बाबुराव हाडवळे, सदाशिव भिमाजी कानवडे, सुदाम तबाजी हांडे, सुरेश गेनू कानवडे, सुनील हिम्मतलाल शहा, हरिभाऊ मंजुळ फापाळे तसेच व्यवस्थापक प्रवीण देवराम सोळसे आणि समस्त लिंगदेव ग्रामस्थ विशेष परिश्रम घेत आहेत.

# थोडक्यात पण महत्वाचे

## उत्तराधिकारी आदिनाथ मालुसरे यांचा दि. ९ रोजी पदवी प्रदान समारंभ



अहिल्यानगर (स. गांवकरी) : नगर तालुक्यातील श्री क्षेत्र बाळनाथ गड येथे मंगळवार दि. ९ जून २०२६ रोजी हभप चि. धर्मनाथ आदिनाथ मालुसरे महाराज यांचा संतचरणरज श्री.छगन महाराज मालुसरे यांच्या आशीर्वादाने श्री.क्षेत्र बाळनाथ गड उत्तराधिकारी म्हणून पदवी प्रदान समारंभ संपन्न होत आहे. या समारंभ निमित्त सकाळी ७ वा. चैतन्य बाळ नाथांचा अभिषेक होऊन सकाळी ८ वा. विष्णू याग व दीक्षा समारंभ होईल याचे पौराहित्य हभप प्रसाद महाराज देव करणार आहेत. सकाळी ९ ते ११ या वेळेत डॉ.विकास महाराज मिसाळ यांचे हरिकीर्तन होणार आहे त्यानंतर उत्तराधिकारी पदवी प्रदान समारंभ संपन्न होईल.अशी माहिती हभप आदिनाथ छगन महाराज मालुसरे यांनी दिली. या धार्मिक सोहळ्यासाठी अहिल्यानगरचे खा.निलेश लंके, माजी खा.डॉ.सुजय विखे पाटील, आ.संग्राम जगताप, आ.विक्रम पाचपुते, आ. अक्षय कर्डिले, आ.मोनिकाताई राजळे उपस्थित राहणार आहेत.तरी पंचक्रोशीतील बाळनाथ गडाच्या सेवेत असणारे मान्यवर व्यक्ती, भाविकांनी या समारंभास मोठ्या संख्येने उपस्थित रहावे. असे आवाहन वारकरी संप्रदायाच्या वतीने प्रदेश उपाध्यक्ष माऊली गायकवाड यांनी केले आहे.

## श्री. स्वामी समर्थ मंदिरातील मोगरा महोत्सवाने भाविक सुखावले



अहिल्यानगर (स. गांवकरी) : सावेडी उपनगरातील गुलमोहर रोडवरील श्री.स्वामी समर्थ मंदिरात आदिक मासानिमित्त मोगरा महोत्सव साजरा करण्यात आला. गेल्या तीन आठवड्यापासून श्री.स्वामी समर्थ मंदिरात आदिक मासामुळे विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येत होते. नित्य नियमाने रुद्राभिषेक, पोथी वाचन विष्णुयाग संपन्न झाले. गेल्या शुक्रवार (दि.५) रोजी सकाळी विजय पानमळकर या भाविकांनी मोगरा फुलाच्या सजावटीने श्री स्वामी समर्थ मूर्तीचे सुशोभीकरण केले. या सेवेमुळे स्वामी भक्तांनी कौतुक केले. या मोगरा महोत्सवामुळे संपूर्ण मंदिरात मोगऱ्याच्या सुगंधाने वातावरण दरवळले होते स्वामीभक्त सुखावले होते.

## 'खडकी' मध्ये बोअरवेलच्या वादातून दोन गटांमध्ये तुफान हाणामारी

अहिल्यानगर (स. गांवकरी) : तालुक्यातील खडकी गावात समाईक शेतजमिनीवरील बोअरवेलमध्ये मोटार बसविण्याच्या वादातून दोन गटांमध्ये तुफान हाणामारी झाल्याची घटना गुरूवार (दि.४ जून) रोजी दुपारी घडली. या प्रकरणात दोन्ही बाजूंनी एकमेकांविरोधात गंभीर आरोप करत अहिल्यानगर तालुका पोलीस ठाण्यात स्वतंत्र फिर्यादी दाखल केल्या असून, पोलिसांनी दोन्ही गटांतील एकूण ११ जणांविरूध्द विविध कलमान्वये गुन्हे नोंदविले आहेत. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, खडकी शिवारातील गायरान गट क्रमांक १८१ मधील समाईक बांधावरील जुन्या बोअरवेलमध्ये इलेक्ट्रिक मोटार बसविण्याच्या कारणावरून हा वाद उफाळून आला. संबंधित बोअरवेलवर दोन्ही बाजूंकडून हक्क सांगितला जात असून त्यातूनच वादाची ठिणगी पडल्याचे समोर आले आहे. मिरा जिमदार काळे (वय ४०, रा. खडकी) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून वायसर जिमदार काळे, जितू वायसर काळे, धनू वळखावण्या काळे, स्वतीप वळखावण्या काळे, शरद वायसर काळे व प्रियंका जितु काळे (सर्व रा. खडकी) यांच्याविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तसेच दुसऱ्या गटाच्या प्रियंका जितेंद्र काळे (वय २२, रा. खडकी) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून कल्याण जिमदार काळे, मिरा जिमदार काळे, संदीप पाराजी चव्हाण, छाया किसन भोसले, आकाबाई वायशा भोसले (सर्व रा. खडकी) यांच्याविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## जिल्हा परिषद सदस्यासह तिघांना बेदम मारहाण

अहिल्यानगर (स. गांवकरी) : स्वस्तात सोन्याच्या व्यवहाराचे आमिष दाखवून रायगड जिल्हा परिषदेचे सदस्य तथा व्यावसायिक अविनाश अनिल नलावडे (वय ३४, रा. सणसवाडी, ता. माणगाव, जि. रायगड) यांना अहिल्यानगर जिल्ह्यात बोलावून त्यांच्यासह साथीदारांवर जीवघेणा हल्ला करत तब्बल ५२ लाख ८० हजार रूपयांचा ऐवज लुटल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. हल्ल्यात जखमी झालेले नलावडे यांच्यावर येथील खासगी रूग्णालयात उपचार सुरू आहेत. त्यांनी उपचारादरम्यान दिलेल्या जबाबावरून अहिल्यानगर तालुका पोलीस ठाण्यात १४ ते १६ जणांविरूध्द फसवणूक, दरोडा कलमान्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. राजु मोहिते, अक्षय मोहिते (दोघे रा. नांदेड), बापु पवार व त्याचा भाऊ (नाव माहिती नाही, दोघे रा. हिगोंली) तसेच अनोळखी १० ते १२ जणांविरूध्द गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

# इन्शुरन्स क्लेमसाठी स्वतःचीच स्कॉर्पिओ 'चोरली'! स्थानिक गुन्हे शाखेची धडक कारवाई

## फिर्यादीसह तिघांना अटक, १० लाखांचा मुद्देमाल जप्त

अहिल्यानगर : (स. गांवकरी)

अहिल्यानगर शहरात वाहन चोरीच्या वाढत्या घटनांच्या पार्श्वभूमीवर स्थानिक गुन्हे शाखेने एक धक्कादायक कट उघडकीस आणला आहे. स्वतःच्या मालकीची स्कॉर्पिओ चोरीला गेल्याची खोटी तक्रार देऊन इन्शुरन्स कंपनीकडून विम्याची रक्कम लाटण्याचा प्रयत्न करणाऱ्या फिर्यादीसह तीन जणांना पोलिसांनी अटक केली आहे. या कारवाईत सुमारे १० लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. तोफखाना पोलीस ठाण्यात अर्शद अयुब शेख (रा. मुकुंदनगर, अहिल्यानगर) याने त्याची स्कॉर्पिओ चोरीला गेल्याची तक्रार दाखल केली होती. त्यानुसार भारतीय न्याय संहिता २०२३ च्या कलम ३०५ (ब) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता. दरम्यान, वाहन चोरीच्या घटनांचा छडा लावण्यासाठी पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांच्या आदेशानुसार स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक किरणकुमार कबाडी यांच्या नेतृत्वाखाली विशेष पथक तयार करण्यात आले होते. तपासादरम्यान दि. ४ जून रोजी मिळालेल्या माहितीच्या आधारे पोलिसांनी श्रीरामपूर येथील मैनुद्दीन शकील पठाण (वय २१) याला ताब्यात घेतले. चौकशीत त्याने धक्कादायक कबुली दिली. फिर्यादी अर्शद शेख याच्या सांगण्यावरून आणि सलमान मेहबूब खान (रा. कोठला, अहिल्यानगर) यांच्या मदतीने स्कॉर्पिओ चोरीचा बनाव रचल्याचे त्याने कबूल केले. पोलिस तपासात समोर आलेल्या माहितीनुसार, स्कॉर्पिओ वाहन चोरीला गेल्याची खोटी तक्रार देऊन इन्शुरन्स कंपनीकडून मोठी रक्कम मिळविण्याचा कट रचण्यात आला होता. मात्र स्थानिक गुन्हे शाखेच्या वेगवान तपासामुळे हा संपूर्ण कट काही दिवसांतच उघडकीस आला.



या कारवाईत गुन्ह्यात वापरण्यात आलेला सुमारे ५ लाख रुपये किमतीचा छोटा हत्ती टेम्पो आणि ५ लाख रुपये किमतीची स्कॉर्पिओ असा एकूण १० लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

विशेष म्हणजे या प्रकरणात मूळ फिर्यादीच कटाचा सूत्रधार असल्याचे निष्पन्न झाल्याने शहरात मोठी खळबळ उडाली आहे. अटक करण्यात आलेल्या तिन्ही आरोपींना पुढील तपासासाठी तोफखाना पोलीस ठाण्याच्या ताब्यात देण्यात आले असून पुढील तपास सुरू आहे. सदरची कारवाई पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक किरणकुमार कबाडी तसेच त्यांच्या पथकातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी यशस्वीरीत्या पार पाडली.

# उपसरपंचपदी संदीप शिंदे यांची बिनविरोध निवड

कळवण : (स. गांवकरी)




कळवण तालुक्यातील कळवण खुर्द ग्रामपंचायतीच्या उपसरपंचपदी संदीप रामदास शिंदे यांची बिनविरोध निवड झाल्याने गावात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. ग्रामपंचायतीच्या सभागृहात पार पडलेल्या विशेष सभेमध्ये ही निवड प्रक्रिया पार पडली. उपसरपंच पदासाठी संदीप शिंदे यांचा एकमेव अर्ज दाखल झाल्याने त्यांची बिनविरोध निवड जाहीर करण्यात आली. संदीप शिंदे यांच्या निवडीने ग्रामपंचायतीत नव्या आशा, अपेक्षा आणि विकासाचा नवा अध्याय सुरू होईल, अशी भावना ग्रामस्थांकडून व्यक्त केली जात आहे. गावाच्या विकासासाठी सातत्याने सक्रिय राहणारे, सामाजिक प्रश्नांवर भूमिका घेणारे आणि सर्वसामान्य नागरिकांशी थेट संवाद ठेवणारे व्यक्तिमत्त्व म्हणून त्यांची ओळख आहे. त्यामुळे त्यांच्या निवडीकडे केवळ राजकीय बदल म्हणून नव्हे, तर गावाच्या भविष्यासाठी महत्त्वपूर्ण पाऊल म्हणून पाहिले जात आहे.

निवडीनंतर ग्रामपंचायत कार्यालयात त्यांचा सत्कार करण्यात आला. उपस्थित ग्रामस्थ, पदाधिकारी आणि समर्थकांनी फेटे बांधून, पुष्पगुच्छ देत त्यांचे अभिनंदन केले. या प्रसंगी गावातील विकासकामांना गती देणे, पाणी, रस्ते, स्वच्छता, शिक्षण, तरुणांना संधी आणि शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर प्राधान्याने लक्ष देण्याची अपेक्षा ग्रामस्थांनी व्यक्त केली.या वेळी उपस्थित मान्यवर बापू शिंदे (पोलीस पाटील )पोपट शिंदे, मोतीराम शिंदे, बाळासाहेब शिंदे, परशराम शिंदे, सीताराम शिंदे, हितेंद्र पगार, दीपक सोनवणे,दादाजी शिंदे,बाळू शिंदे, पांडुरंग शिंदे, आनंदराव शिंदे, अशोक शिंदे, मनोज पगार, मिथुन शिंदे, स्वप्नील पगार, भाऊसाहेब शिंदे, जिभाऊ शिंदे,समाधान निकम, दत्तू शिंदे, समाधान निकम, योगेश पवार, सुनील शिंदे, लखन देवरे, तुकाराम शिंदे, राहुल शिंदे, "सत्ता नव्हे, सेवा महत्त्वाची" ग्रामपंचायत ही गावाच्या विकासाची पहिली शाळा मानली जाते. येथे निवडून येणारे प्रतिनिधी जर पक्षीय राजकारणापेक्षा लोकहिताला प्राधान्य देतील, तर गावांचा चेहरामोहरा बदलू शकतो. उपसरपंचपदी बिनविरोध निवड होणे हे गावातील एकोपा आणि लोकशाहीतील परिपक्वतेचेही प्रतीक मानले जाते. कारण निवडणुकीतील वाद, गटबाजी आणि संघर्ष टाळून गावहिताला प्राधान्य दिले गेले, हा सकारात्मक संदेश यातून समोर येतो. मात्र, केवळ सत्कार आणि अभिनंदनावर विकास थांबता कामा नये.

# सराईत गुन्हेगार गिरीश बागुल अटकेत

डांग (गुजरात) : (स. गांवकरी)



डांग जिल्ह्याच्या मुख्यालय असलेल्या आहवा येथील उपजिल्ह्यातून चित्रपटातील प्रसंगाप्रमाणे फरार झालेल्या दोन कैद्यांपैकी एका कुख्यात आरोपीला अवघ्या काही दिवसांत अटक करण्यात डांग जिल्हा पोलिसांना मोठे यश मिळाले आहे. मिळालेल्या माहितीनुसार, गिरीशभाई सोनजुभाई बागुल आणि विजयभाई मंगुभाई धुम हे दोघे आरोपी ४ जून रोजी रात्री आहवा उपजिल्ह्याच्या बैरकमध्ये बंदिस्त होते. यावेळी दोघांनीही रात्री उशिरा पोटात असह्य वेदना होत असल्याचे नाटक करत मोठ्याने आरडाओरडा सुरू केला. कैद्यांची अवस्था पाहून जेलगार्ड तपासणीसाठी बैरकजवळ गेले असता, दोन्ही आरोपींनी पूर्वनियोजित कटानुसार त्यांच्यावर हल्ला करून झटापट केली. शासकीय कर्मचाऱ्याच्या कर्तव्यात अडथळा निर्माण करत त्यांनी उपजिल्ह्याचा मुख्य दरवाजा उघडला आणि अंधाराचा फायदा घेत तेथून पळ काढला. या घटनेमुळे संपूर्ण पोलीस यंत्रणेत खळबळ उडाली. प्रकरणी आहवा पोलीस ठाण्यात विविध कायदेशीर कलमांखाली गुन्हा दाखल करून तपास सुरू करण्यात आला. फरार आरोपींचा शोध घेण्यासाठी जिल्हा पोलीस अधीक्षक पूजा यादव यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष कृती आराखडा तयार करण्यात आला. स्थानिक पोलिसांसह विविध विशेष पथके तयार करून जिल्हाभर तसेच सीमावर्ती भागांत शोधमोहीम आणि नाकाबंदी राबविण्यात आली.

# नारायणगाव महाविद्यालय जागतिक पर्यावरण दिवस साजरा

खोडद : (स. गांवकरी)

ग्रामोननती मंडळ कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय जागतिक पर्यावरण दिवस (world environment day) या कार्यक्रमांमध्ये राष्ट्रीय छात्र सैनिकांनी सहभाग नोंदवला व झाडांचे संगोपन व लागवड केली.यावेळी प्राचार्य डॉक्टर आनंद कुलकर्णी वनस्पतीशास्त्र प्रमुख डॉ. अशोक कानडे, प्रा.मयुरी वाजगे आणि सोबतच राष्ट्रीय छात्र सेनेचे एकुण ६० कॅडेट उपस्थित झाले. जागतिक पर्यावरण दिवसाची माहिती डॉ.कॅप्टन दिलीप शिवणे सरांनी दिली, प्रमुख वक्ते प्रा.डॉ.अशोक कानडे सर ह्यांनी जागतिक पर्यावरण दिनाच्या निमित्ताने देशी आणि विदेशी झाडांच्या गुणधर्माविषयी देशी झाडे कोणती व किती असतात त्यांचे गुणधर्म विदेशी झाडांचे गुणधर्म कॅडेट ला संबोधित केले. व त्यांचा कशा प्रकारे आपण विविध उपयोग करू शकतो हे देखील समजाऊन सांगितले.प्रो. डॉ.अशोक कानडे ह्यांनी सर्व कॅडेट्स ला खूप चांगल्या प्रकारे सर्व झाडांची माहिती सांगितली त्यांच्या माहिती तुन आम्हाला बऱ्याच झाडांची माहिती मिळाली. जागतिक पर्यावरण दिन दरवर्षी ५ जून रोजी साजरा केला जातो. याचा उद्देश म्हणजे लोकांमध्ये पर्यावरणाविषयी जागरूकता निर्माण करणे आणि निसर्गाचे रक्षण करण्यासाठी कृतीशील होणे.जागतिक पर्यावरण दिन दरवर्षी जगभर ५ जून रोजी साजरा केला जातो या पर्यावरणाच्या रक्षणासाठी जागरूकता आणि कृतीला प्रोत्साहन देण्यासाठी संयुक्त राष्ट्राचे प्रमुख साधन आहे.

# कृषी विभाग शेतकरी सल्लागार समिती अध्यक्षपदी विकास चव्हाण यांची निवड

आळेफाटा : (स. गांवकरी)

कृषी विभाग आत्मा (कृषी तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणा) अंतर्गत जुन्नर तालुकास्तरीय शेतकरी सल्लागार समिती (BFAC) ची पहिली बैठक उत्साहात पार पडली. या बैठकीमध्ये समितीच्या अध्यक्षपदी श्री. विकास हरिभाऊ चव्हाण यांची बिनविरोध निवड करण्यात आली.

कृषी विभाग आत्मा (कृषी तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणा) अंतर्गत जुन्नर तालुकास्तरीय शेतकरी सल्लागार समिती (BFAC) चे सदस्य, जिल्हास्तरीय शेतकरी सल्लागार समिती (DFAC) चे सदस्य तसेच तालुकास्तरीय शेतकरी सल्लागार समितीच्या बिनविरोध अध्यक्षपदी निवड होऊन उल्लेखनीय यश संपादन केल्याबद्दल विकास हरिभाऊ चव्हाण यांचे जनसामान्यातून कौतुक होत आहे. विकास चव्हाण हे महाराष्ट्र शासन कृषी विभागाचे मानाचा वसंतराव नाईक कृषीनिष्ठ शेतकरी पुरस्कार प्राप्त शेतकरी असून, ऊस उत्पादनवाढ व शाश्वत शेती क्षेत्रात त्यांचे उल्लेखनीय योगदान आहे. ऊस खोडवा पाचट व्यवस्थापन चळवळ, "पाचट जाळू नका – पर्यावरण वाचवा" जनजागृती अभियान तसेच ऊसाचे एकरी १०० टन उत्पादन या संकल्पनेच्या प्रसारासाठी त्यांनी राज्यभर शेतकरी मेळावे, चर्चासत्रे व शिवार फेऱ्यांच्या माध्यमातून प्रभावी कार्य केले आहे.ऊस लागवडीसाठी सुपर केन नर्सरी चळवळीचे ते प्रणेते असून, शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन प्रत्यक्ष मार्गदर्शन करण्याचे त्यांचे कार्य सातत्याने सुरू आहे. आधुनिक कृषी तंत्रज्ञान शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविण्यात त्यांचे मोलाचे योगदान आहे.श्री विघ्नहर सहकारी साखर कारखान्याचे तज्ञ संचालक म्हणून कार्यरत असून, यापूर्वी त्यांनी महाराष्ट्र राज्य ऊस नियोजन समितीवर सदस्य म्हणून काम पाहिले आहे. विविध राज्यस्तरीय समित्यांवर त्यांनी जबाबदारीने काम केले असून, अनेक पुरस्कारांनी ते सन्मानित आहेत. त्यांच्या निवडीचे शेतकरी व कृषी क्षेत्रातून सर्वत्र स्वागत व अभिनंदन होत आहे.



# राज्यपाल जिष्णू देव वर्मा यांची जागतिक पर्यावरण दिन कार्यक्रमास उपस्थिती




मुंबई : (स. गांवकरी)

जागतिक पर्यावरण दिन २०२६ निमित्त वांद्रे येथील कार्टर रोड खुल्या रंगमंचावर आयोजित विशेष कार्यक्रमात महाराष्ट्राचे राज्यपाल जिष्णू देव वर्मा यांनी सहभाग नोंदवत पर्यावरण संवर्धनासाठी सामूहिक प्रयत्नांची गरज अधोरेखित केली. 'आताच हवामानासाठी' आणि 'भूमी नमस्कार' या उपक्रमांतर्गत आयोजित कार्यक्रमात भामला प्रतिष्ठानचे अध्यक्ष आसिफ भामला यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. हवामान बदलाबाबत जनजागृती निर्माण करण्याबरोबरच प्रत्यक्ष कृतीला प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने आयोजित या कार्यक्रमात पर्यावरण संरक्षणाचा संदेश देणाऱ्या देशव्यापी मोहिमेचे तसेच विशेष पर्यावरण गीताचे अनावरण करण्यात आले. यावेळी राज्यपालांच्या हस्ते 'पर्यावरण नेतृत्व पुरस्कार' प्रदान करण्यात आले. कार्यक्रमास सांस्कृतिक कार्यमंत्री आशिष शेलार, गायक शंकर महादेवन, अभिनेते राघव जुयाल, वेशभूषाकार मनीष मल्होत्रा, आध्यात्मिक मार्गदर्शक गौर गोपाल दास, गायक टोनी कक्कर, अभिनेते अर्जुन बिजलानी, अभिनेत्री मन्नारा चोप्रा यांच्यासह सामाजिक, सांस्कृतिक आणि मनोरंजन क्षेत्रातील अनेक मान्यवर उपस्थित होते.

यावेळी बोलताना आसिफ भामला म्हणाले, "जागतिक पर्यावरण दिन ही केवळ दिनदर्शिकेतील तारीख नसून पृथ्वीप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याची आणि पर्यावरणपूरक कृती करण्याची संधी आहे. 'आताच हवामानासाठी' आणि 'भूमी नमस्कार' या उपक्रमांच्या माध्यमातून पर्यावरणीय जबाबदारी दैनंदिन जीवनाचा भाग बनविण्याचा आमचा प्रयत्न आहे."

भामला प्रतिष्ठानने वृक्षारोपण, शहरी वनसंवर्धन, समुद्रकिनारा स्वच्छता, खारफुटी संवर्धन, कचरा व्यवस्थापन आणि जनजागृती मोहिमांद्वारे उल्लेखनीय कार्य केले आहे. संस्थेच्या माहितीनुसार, आतापर्यंत ५० हजारांहून अधिक वृक्ष लागवड, ५५० हून अधिक समुद्रकिनारा स्वच्छता उपक्रम, ८०० पेक्षा अधिक संस्थांचा सहभाग आणि ३० हजारांहून अधिक पर्यावरण रक्षकांचे जाळे उभारण्यात आले आहे. सायंकाळी झालेल्या कार्यक्रमात वंदे मातरम्, राष्ट्रगीत, महाराष्ट्र राज्यगीत, स्वागत समारंभ, पर्यावरण नेतृत्व पुरस्कार वितरण तसेच पर्यावरणविषयक विविध मोहिमांचा प्रारंभ करण्यात आला. पर्यावरण संरक्षणासाठी समाजातील सर्व घटकांनी एकत्र येण्याचा संदेश या कार्यक्रमातून देण्यात आला.



ठाणे : दिवा रेल्वे स्थानकाचे फाटक फक्त वाहनांसाठी उघडते. रेल्वे रूळ ओलांडून आपघात बळी टाळण्यासाठी सर्वसामान्य लोकल प्रवाश्यांना रेल्वे फाटकातून जाण्यास बंदी घालण्यात आली असून देखील बंद फाटकातून रेल्वे सुरक्षा रक्षकासमोर प्रवाश्यांचे रेल्वे रूळ ओलांडने सुरु असल्याचे दिवा रेल्वे स्थानकात चित्र पहावयास मिळत आहे. सदर प्रकाराकडे रेल्वे प्रशासनाचे दुर्लक्ष दिसून येत असून जर बंद फाटकातून रेल्वे रूळ ओलांडताना आपघात बळी गेल्यास जबाबदार कोण राहणार हा प्रश्न निर्माण झाला आहे. (फोटो - संतोष पडवळ)

## थोडक्यात बातम्या...



### ठाणे शहरातील खुनाच्या गुन्ह्यातील आरोपी २४ तासात जेरबंद

ठाणे (स. गांवकरी) : ठाणे वर्तकनगर पोलीस ठाण्याचे हद्दीत पोखरण रोड नं २ येथील हनुमान मंदिराजवळ, ठाणे पश्चिम येथे काही अज्ञात इसमांनी एका इसमास मारहाण केल्यानंतर त्याचा मृत्यु झाल्याची घटना घडली होती. सदर घटनेचा गुन्हे शाखा, वागळे युनिट ५ कडुन समांतर तपास करीत असताना मिळालेल्या गुप्त बातमी वरून सदर गुन्हयात आरोपी नामे १) अजय देवकीलाल गिरी, वय २८ वर्ष, रा. कटकुईया, पो. वंशापुर्वा, ता. हल्दी, जि. बहराईच, उत्तर प्रदेश २) शिवा संजय गोस्वामी, वय २५ वर्ष, रा. नारायणपुर कला, पो. कटकुईया, ता. नानपुरा, जि. बहराईच, उत्तर प्रदेश यांना प्राथमिक तपासामध्ये निष्पन्न करण्यात आले. सदर आरोपींच्या संबंधाने करण्यात आलेल्या तांत्रीक विश्लेषणावरून सदर आरोपी हे पनवेल रेल्वे स्टेशन वरून गोरखपुर एक्सप्रेस मधून पळून जात असल्याची खात्रीलायक माहिती प्राप्त झाली होती. त्याअनुषंगाने व.पो. निरी सलील भोसले यांनी घटक - ५ वागळे कार्यालयाकडील सपोनि. पल्लवी ढगे पाटील, PSI सुनिल अहिरे तसेच ASI राजेंद्र चौधरी, पो.ना/७१५९ तेजस ठाणेकर, पो. कॉ/८०३३ मिनीनाथ शिकारे यांना आरोपींचा तात्काळ शोध घेवून त्यांना ताब्यात घेण्याकामी रवाना केले होते. त्याअनुसार सदर पथकाने रेल्वेमधून सदर आरोपींच्या गुप्त पध्दतीने पाठलाग करून आरोपीना व त्यांचे सोबत १३ संशयित इसमांना कसारा रेल्वे स्टेशन येथे १८.४५ वा. ताब्यात घेतले. सदर गुन्हयाचा पुढील तपास वर्तकनगर पो. स्टे कडुन करण्यात येत आहे.

### दुर्गम भागातील गरजू नागरिकांना कपड्यांचे वाटप

राजगुरुनगर (स. गांवकरी) : राजगुरुनगर येथील माऊली सेवा प्रतिष्ठानच्या वतीने खेड तालुक्यातील दुर्गम भागातील गरजू नागरिकांना कपड्यांचे वाटप करण्यात आले. सामाजिक बांधिलकी जपत प्रतिष्ठानने राबविलेल्या या उपक्रमाला नागरिकांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. गोरगरिबांच्या मदतीसाठी नेहमीच अग्रेसर असलेल्या माऊली सेवा प्रतिष्ठानने गेल्या चार वर्षांपासून समाजातील गरीब व दुर्बल घटकांसाठी विविध समाजोपयोगी उपक्रम राबविले आहेत. या अंतर्गत शहरातील नागरिकांकडून जुने परंतु वापरण्यायोग्य कपडे संकलित करण्यात येतात. त्यानंतर कपड्यांची वर्गवारी करून गरजूंना त्यांचे वाटप केले जाते. गेल्या दीड महिन्यात जमा झालेल्या सुमारे ३० पोती कपड्यांचे नुकतेच खेड तालुक्यातील शिरगावजवळील कातकरी वस्ती, विठ्ठलवाडी तसेच टोकावडेजवळील कातकरी भिसे वस्ती येथील नागरिकांना वितरण करण्यात आले. या उपक्रमाचा परिसरातील १५० हून अधिक नागरिकांनी लाभ घेतला. या उपक्रमाबद्दल लाभार्थी नागरिकांनी माऊली सेवा प्रतिष्ठानचे आभार मानत समाधान व्यक्त केले. समाजातील गरजूंपर्यंत मदतीचा हात पोहोचविण्याचे कार्य यापुढेही सुरू ठेवणार असल्याची भावना प्रतिष्ठानच्या पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केली. यावेळी माऊली सेवा प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष कैलास दुधाळे, बाबाजी कातोरे, सविता लोंढे, विद्या लांघी आणि जया काटे यांनी उपक्रमाच्या आयोजनासाठी विशेष परिश्रम घेतले.

### गायींच्या मोठ्या आवकेने आळेफाटा बाजार गजबजला



खोडद (स. गांवकरी) : आळेफाटा येथील कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आवारात गुरुवारी भरलेल्या साप्ताहिक पशुधन बाजारात गायींची विक्रमी आवक झाल्याने बाजार परिसरात मोठी गर्दी पाहायला मिळाली. जुन्नर, आंबेगाव, खेड, शिरूर, पुणे आणि नगर जिल्ह्यासह विविध भागांतून पशुपालक मोठ्या संख्येने बाजारात दाखल झाले होते. दूधाळ गायींच्या खरेदी-विक्रीसाठी शेतकरी, व्यापारी आणि ग्राहकांनी मोठी उपस्थिती लावली. विविध जातींच्या गायींना चांगली मागणी असल्याने व्यवहारांना वेग आला. गायींची किंमत, दूध उत्पादन क्षमता आणि आरोग्य यांची पाहणी करून खरेदीदारांनी मोठ्या प्रमाणावर व्यवहार केले. बाजारात झालेल्या विक्रमी आवकेमुळे परिसरातील व्यापार, वाहतूक आणि इतर व्यवसायांनाही चालना मिळाली. पशुधन बाजारामुळे स्थानिक अर्थव्यवस्थेला बळकटी मिळत असून बाजार समितीने व्यापारी आणि पशुपालकांसाठी आवश्यक सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत. बाजार समितीच्या अधिकाऱ्यांनी पशुपालकांना योग्य मार्गदर्शन करत बाजाराचे नियोजन सुरळीतपणे केले. बाजार समितीचे सचिव रुपेश कवडे आणि सतीश मस्करे यांनी यावेळी गाईंची मोठ्या प्रमाणात आवक झाल्याची माहिती दिली .बाजार समितीचे सभापती संजय काळे यांच्या मार्गदर्शनाखाली बाजाराचे नियोजन करण्यात आले होते. गायींच्या मोठ्या आवकेमुळे बाजारात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते.

# शिवराज्याभिषेक सोहळा उत्साहात साजरा

ठाणे : (स. गांवकरी)



हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांच्या राज्याभिषेक दिनानिमित्त जिल्हा परिषद ठाणे येथे आज, दि. ०६ जून, २०२६ रोजी शिवस्वराज्य दिन मोठ्या उत्साहात व प्रेरणादायी वातावरणात साजरा करण्यात आला. महाराष्ट्र शासनाच्या निर्देशानुसार आयोजित या कार्यक्रमात छत्रपती शिवाजी महाराजांच्या पराक्रम, दूरदृष्टी आणि लोककल्याणकारी प्रशासनाच्या कार्याचा गौरव करण्यात आला. ६ जून १६७४ रोजी रायगड किल्ल्यावर छत्रपती शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक झाला. स्वराज्य, स्वाभिमान, लोककल्याण आणि सुशासनाची मुहूर्तमेढ रोवणाऱ्या या ऐतिहासिक घटनेच्या स्मरणार्थ राज्यभर शिवस्वराज्य दिन साजरा करण्यात येतो. त्याच अनुषंगाने जिल्हा परिषद ठाणे येथे विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमाची सुरुवात मुख्य कार्यकारी अधिकारी रणजित यादव यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून तसेच छत्रपती शिवाजी महाराज आणि राजमाता जिजाऊ यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. यानंतर मानाची स्वराज्य गुढी उभारून तिचे पूजन करण्यात आले. उपस्थित अधिकारी व कर्मचाऱ्यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेस अभिवादन करून त्यांच्या कार्याला आदरांजली वाहिली. यावेळी राष्ट्रगीत व राज्यगीताचे सामूहिक गायन करण्यात आले. शिक्षक रविंद्र तरे आणि सहशिक्षक यांनी पोवाडा गायन केले तसेच "जय भवानी, जय शिवाजी" आणि "छत्रपती शिवाजी महाराज की जय" अशा घोषणांनी संपूर्ण परिसर दुमदुमून गेला. कार्यक्रमादरम्यान शिवचरित्रातील विविध पैलूंवर प्रकाश टाकण्यात आला. यावेळी मार्गदर्शन करताना मुख्य कार्यकारी अधिकारी रणजित यादव म्हणाले, "छत्रपती शिवाजी महाराजांनी लोककल्याण, न्याय, पारदर्शकता आणि सुशासन यांचे जे आदर्श निर्माण केले, ते आजही प्रशासनासाठी प्रेरणादायी आहेत. सर्वसामान्य जनतेच्या हिताला सर्वोच्च प्राधान्य देणारी राज्यकारभाराची संकल्पना महाराजांनी प्रत्यक्षात उतरविली. त्यांच्या विचारांचा आदर्श घेऊन नागरिकाभिमुख, पारदर्शक आणि जबाबदार प्रशासन उभारण्यासाठी आपण सर्वांनी प्रयत्नशील राहिले पाहिजे. शिवराज्याभिषेक दिन हा केवळ ऐतिहासिक स्मृतीदिन नसून सुशासन, कर्तव्यनिष्ठा आणि राष्ट्रभक्तीची प्रेरणा देणारा दिवस आहे."

# बदलत्या हवामानाचा बाजरी पिकाला फटका

ओतूर : (स. गांवकरी)

जुन्नर तालुक्यातील उन्हाळी बाजरीचा हंगाम सध्या अंतिम टप्प्यात आला असून, यंदा पीक चांगले असताना देखील हवामान बदलामुळे उत्पादनात घट झाली आहे. हंगामाच्या अखेरीस झालेल्या अवकाळी पावसाने दोन ते तीन वेळा जोरदार हजेरी लावल्याने पिकांचे नुकसान झाले. अनेक ठिकाणी बाजरी आडवी पडणे व फुलोरा खराब होणे तसेच तीव्र उन्हामुळे बाजरीच्या फुलोऱ्याचा गळ होणे तसेच कणसे पूर्ण न भरणे अशा समस्यांचा मोठा परिणाम उत्पादनावर झाला. त्यामुळे शेतकरी वर्ग अडचणीत आला आहे. उन्हाळी बाजरीला निसर्गाचा तडाखा बसल्याने शेतकऱ्यांची आर्थिक गणिते बिघडली. यावर्षी ऊसतोडणी लवकर पूर्ण झाल्यामुळे शेतकऱ्यांनी ऊसाच्या शेतात रोटर मारून मोठ्या प्रमाणात उन्हाळी बाजरीची पेरणी केली होती. त्यामुळे यावर्षी पेरणीचे क्षेत्र वाढले होते. सध्या शेतकरी वर्ग पीक वाचवण्यासाठी प्रयत्नशील असून, कापणी व कुडणीची कामे वेगात सुरू आहेत. येत्या सात ते आठ दिवसांत हंगाम पूर्णपणे संपण्याची शक्यता आहे. बाजरी उत्पादनात आदिवासी समाजाचा मोलाचा वाटा असून, निम्मा किंवा तृतीयांश वाट्याने ते शेतकऱ्यांना मदत करतात. दरम्यान, बाजारात बाजरीला सध्या २५ ते ३५ रुपये प्रति किलो दर मिळत असून, वैरणीचे दर ३०० ते ६०० रुपये प्रति शेकडा आहेत. मात्र वाढलेले उत्पादन खर्च, डिझेलचे दर आणि मळणी यंत्रांच्या वाढत्या भाड्यामुळे शेतकऱ्यांच्या हाती अपेक्षित नफा राहत नसल्याची खंत शेतकरी वर्गाकडून व्यक्त होत आहे.

# वृक्षारोपण व नदी किनारी स्वच्छता मोहीम



इगतपुरी : (स. गांवकरी)

जागतिक पर्यावरण दिनानिमित्त दारणामाई प्रतिष्ठान, सखी सोशल गृप आणि एक मित्र एक वृक्ष ग्रुप यांच्या संयुक्त विद्यमाने घोटी पोलीस ठाणे परिसरात वृक्षारोपण करण्यात आले. तसेच निसर्ग प्रेमी सिनेअभिनेते चिन्मय दादा उदगीरकर यांच्या मार्गदर्शनाखाली वृक्षारोपण व दारणा नदी किनारी स्वच्छता अभियान राबविण्यात आले. जागतिक पर्यावरण दिनानिमित्त घोटी पोलीस ठाणे या ठिकाणी वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी घोटीचे पोलीस निरीक्षक विजय शिंदे, पोलीस उपनिरीक्षक सुरेखा देवरे गोपीनिय अधिकारी निलेश साळवे पोलीस हवालदार मारुती बोराडे, गोपनिय अधिकारी दिपक सांगळे, ग्रामसेवक नांद्रे सरपंच हरिश्चंद्र चव्हाण, ॲड. सोपान चव्हाण, सामाजिक कार्यकर्ते सखाराम गव्हाणे उपसरपंच विजय चंद्रमोरे, देवाजी रायकर दारणानदी सेवक बंटी पगारे, प्रभाकर खाडे, नवीन शिंदे आदी निसर्गप्रेमी उपस्थित होते. घोटी दारणातिरी स्वच्छता अभियानात दारणा नदी सेवक बंटी पगारे, प्रभाकर खाडे, नवीन शिंदे, सखी सोशल ग्रुपच्या वैशाली गोसावी (भोईर ) सुनीता सिंघल, अंजु अग्रवाल, दत्तू भांगरे, धोंडीराम पोकळे, समाधान तोकडे, काशिनाथ भांगरे धोंडीराम पोकळे, घोटी ग्रामपंचायतचे अमोल रुपवते व ग्रामपंचायत सफाई कर्मचारी उपस्थित होते.

# खिरविरे येथील चौघांची पोलीस भरतीत निवड

- आमदार डॉ. किरण लहामटे यांच्या हस्ते सत्कार
- ग्रामस्थांकडून वाजत गाजत गुलाल उधळत गावातून मिरवणूक

राजूर : (स. गांवकरी)





अकोले तालुक्यातील खिरविरे येथील तरूणांनी पोलीस भरतीत उतुंग कामगिरी करत आपले स्वप्न सत्यात उतरविले आहे. खिरविरे गावचे सुपुत्र सिध्देश राजू काळे,काजल पंढरीनाथ बेणके,रंजनी रामनाथ बेणके,व स्वप्नाली विशाल बेणके यांची महाराष्ट्र पोलिस २०२६ मध्ये मुंबई पोलिस पदावर निवड होऊन उत्तुंग कामगिरी बजावली आहे.अकोले तालुक्याचे लोकप्रिय आमदार डॉ.किरण लहामटे यांच्या हस्ते घड्याळ देऊन त्यांचा सत्कार केला व त्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या.यावेळी तुमचा सन्मान हाच तुमच्या पालकांचा सन्मान असून चांगले कर्तव्य बजावत कामगिरी करून यश संपादन केले असल्याचे मत व्यक्त केले.संगमनेर अकॅडमीचे शिक्षक सदगीर सर यांनी पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.खिरविरे परिसरात ग्रामस्थांकडून या चारही विद्यार्थ्यांचे कौतुक होत आहे.अनेक दिवसांची मेहनत एक एक दिवस मोजत आपल्या कामगिरीची वाट न सोडता केलेल्या मेहनतीला अखेर यश प्राप्त झाले असून खिरविरे गावातील ग्रामस्थांकडून गुलाल उधळून मिरवणुक काढण्यात आली.नुकतीच जाहीर झालेल्या मुंबई पोलीस भरतीत निवड झाल्यामुळे परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.या निवडीबद्दल गावातील विविध संस्था,संघटना,तरुण मित्र मंडळ यांच्यावतीने सत्कार करण्यात आला.लहानपणापासून पोलिस होण्याचे स्वप्न मनात धरून ठेवत आज ते पूर्ण झाले. कुठल्याही प्रकारची जाहिरातबाजी न करता आपला अभ्यास व व्यायाम सातत्याने सुरू ठेवला.त्यामुळे यश प्राप्त झाले असल्याचे विचार पोलीस भरती झालेल्या तरूणांनी व्यक्त केले.यावेळी काळू बेनके, रामदास डगळे, उपसरपंच सुभाष बेनके,प्रकाश पराड, सरपंच गणपत डगळे,हरी बेनके,राजू काळे,पंढरी बेनके, रामनाथ बेनके,भीमराव बेनके,गावातील पंचक्रोशीतील सर्व ग्रामस्थ महिला वर्ग तसेच तरुण मित्र मंडळ उपस्थित होते.यावेळी कार्यक्रमाचे सुत्रसंचलन रामदास डगळे यांनी केले तर भास्कर बेनके यांनी उपस्थितांचे आभार मानले.

पोलीस भरतीमध्ये यशस्वी होऊन खाकी वर्दीचे स्वप्न पूर्ण करणाऱ्या तसेच खिरविरे गावाचे नाव रोशन करणाऱ्या उमेदवारांचे मनापासून अभिनंदन! तुमची कठोर मेहनत, जिद्द आणि चिकाटी अखेर फळाला आली असून, पुढील आयुष्यासाठी आणि देशसेवेसाठी तुम्हाला खूप खूप शुभेच्छा. तुमची ही नवी सुरुवात तुम्हाला आयुष्यात सदैव यशाच्या शिखरावर घेऊन जावो.हिच सदिच्छा.

- आ.डॉ.किरणजी लहामटे

# पुस्तकी ज्ञानाबरोबर विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास महत्वाचा आहे

- मानद सचिव एअर कमोडर गणेश जोशी
- खेड तालुका एज्युकेशन सोसायटीच्या वतीने
- गुणवंत विद्यार्थी गुणगौरव समारंभ संपन्न





राजगुरुनगर : (स. गांवकरी)

शिक्षणाचा मुख्य उद्देश ,विद्यार्थ्यांचा विकास आहे त्यासाठी पुस्तकी ज्ञानाबरोबर विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास महत्वाचा आहे. असे प्रतिपादन खेड तालुका एज्युकेशन सोसायटीचे मानद सचिव एअर कमोडर गणेश जोशी यांनी केले.खेड तालुका एज्युकेशन सोसायटीच्या वतीने महात्मा गांधी विद्यालय, कनिष्ठ महाविद्यालय, इंग्रजी माध्यम विद्यालय या तीनही प्रशालेतील इयत्ता दहावी व बारावी मधील गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव समारंभ संपन्न झाला.

यावेळी खेड तालुका एज्युकेशन सोसायटीचे मानद सचिव गणेश जोशी, संचालक हिरामण सातकर, प्रदीप कासवा, बाळासाहेब सांडभोर, स्वानंद खेडकर, व्यवस्थापकीय अधिकारी कैलास पाचारणे, महाविद्यालयाच्या प्राचार्या संध्या कांबळे, इंग्रजी माध्यम विद्यालयाचे मुख्याध्यापक गणेश देठे, उपमुख्याध्यापिका रेखा जाधव, मानसी मेदगे, पर्यवेक्षक, शिक्षक, पालक व विद्यार्थी उपस्थित होते.

खेड तालुका एज्युकेशन सोसायटीचे मानद सचिव एअर कमोडर गणेश जोशी पुढे म्हणाले पुस्तकी ज्ञानाबरोबर विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास महत्वाचा आहे. अभ्यासासोबत मनाचे आरोग्य चांगले ठेवणे अत्यंत आवश्यक आहे. मन शांत आणि तणावमुक्त असेल तर अध्ययन प्रक्रिया प्रभावी होते. मानसिक आरोग्य चांगले असल्यास अभ्यासातील एकाग्रता वाढते. संस्थेचे संचालक बाळासाहेब सांडभोर म्हणाले की दहावी व बारावीच्या विद्यार्थ्यांच्या पालकांनी पाल्याचा कल पाहूनच करिअरची निवड करायला हवी. कलचाचणीद्वारे विद्यार्थ्यांचा कल ओळखता येतो. करिअरची निवड करण्यासाठी समुपदेशनाची मदत घेता येते. संस्थेने या संदर्भात वाचन कक्षामध्ये करिअर कसे निवडावे व दहावी व बारावी नंतरच्या करिअर संदर्भात मार्गदर्शक फ्लेक्स लावलेले आहेत जे पालक व विद्यार्थी या दोघांसाठी उपयुक्त आहेत. यावेळी महात्मा गांधी विद्यालयाची तनिष्का पाचारणे, इंग्रजी माध्यम विद्यालयाची वैष्णवी सातकर, कनिष्ठ महाविद्यालयाची सुप्रिया गोपनार या विद्यार्थिनींनी मनोगत व्यक्त केले. पालक प्रतिनिधी म्हणून संजय पानमंद यांनी मनोगत व्यक्त केले. महात्मा गांधी विद्यालयाच्या विद्यार्थिनींनी ईशस्तवन व स्वागत गीत सादर केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्या संध्या कांबळे व गणेश देठे यांनी केले. इंग्रजी माध्यम विद्यालयाचे बक्षीस वितरणाचे वाचन रहिमा इनामदार यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन तुलसीदास घोलप व अर्चना गोडसे यांनी केले. आभार प्रदर्शन मानसी मेदगे यांनी केले.

## थोडक्यात पण महत्वाचे



### रितेश चौधरी यांना वेदभूषण ज्योतिष प्रतिष्ठानचा ज्योतिष भूषण पुरस्कार

रावेर (स. गांवकरी) : वेदभूषण ज्योतिष प्रतिष्ठान, पुणे व महाराष्ट्र ज्योतिष परिषदेच्या वतीने नुकत्याच झालेल्या राज्यस्तरीय ज्योतिष अधिवेशन सोहळ्यात खिर्डी बुद्रुक येथील पोलिस पाटील रितेश रमेश चौधरी यांना ज्योतिष भूषण-२०२६ या मानाच्या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. वेदभूषण ज्योतिष प्रतिष्ठानचे संस्थापक-अध्यक्ष ज्योतिषाचार्य हर्षद रमेश महाजन व ज्योतिविर्द कुलभूषण मंगळे यांच्या हस्ते त्यांना मानपत्र, शाल व श्रीफळ देऊन गौरवण्यात आले. ज्योतिष भूषण हा चतुर्थ उच्चस्तरीय अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर ही पदवी दिली जाते.हा ज्योतिष शास्त्रीय प्रतिष्ठेचा सन्मान आहे. यंदा जळगाव जिल्ह्यातून केवळ ५ गुरुजींची यासाठी निवड झाली. त्यात खिर्डी, यावल, जळगाव, रावेर आणि भुसावळ येथील मान्यवरांचा समावेश होता. त्यांना पुरस्कार मिळाल्याबद्दल तत्पर फाऊंडेशन,मित्र परिवार आदींनी अभिनंदन केले आहे.

### आर्या लोंढे तालुक्यात प्रथम इस्रो सहलीसाठीही निवड



श्रीरामपूर (स. गांवकरी) : जनसेवा प्रतिष्ठान अहिल्यानगर यांचे वतीने नुकत्याच घेण्यात आलेल्या राज्यस्तरीय डॉ. सी. व्ही. रमण बालवैज्ञानिक परीक्षेमध्ये महाले पोद्दार इंग्लिश मीडियम ची विद्यार्थिनी आर्या भाऊसाहेब लोंढे हिने ८१.३३ टक्के गुण मिळवून तालुक्यात प्रथम क्रमांक पटकावला. त्याचबरोबर तिची विज्ञान कार्यशाळा व इस्रो सहलीसाठीही निवड झालेली आहे. आर्या ही रयत शिक्षण संस्थेचे, न्यू इंग्लिश स्कूल खंडाळा येथील उपशिक्षक भाऊसाहेब लोंढे व कै. अनिल दिगंबर मुळे विद्यालय येथील उपशिक्षिका जयश्री लोंढे यांची कन्या आहे. आर्याच्या यशाबद्दल शैक्षणिक, सामाजिक, राजकीय क्षेत्रासह विविध मान्यवरांनी अभिनंदन केले आहे.




### हर घर योद्धा स्वसंरक्षण शिबिरांना प्रतिसाद; २४४ जणांचा सहभाग

पुणे (स. गांवकरी) : युवक आणि युवतींनी स्वसंरक्षणाच्या माध्यमातून शारीरिक व मानसिकदृष्ट्या सक्षम व्हावे, या उद्देशाने हिंदु जनजागृती समितीच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या सात दिवसीय 'हर घर योद्धा' स्वसंरक्षण शिबिरांना पुणे जिल्ह्यात उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. १९ एप्रिलपासून सुरू झालेल्या या अभियानांतर्गत नायगाव, पेठ, लोणी काळभोर, कोलवडी, थेऊर, पांडवदंड, दहिटणे, शिरवळ, भोर, तळेगाव दाभाडे आणि राजगुरूनगर येथे शिबिरे पार पडली. या शिबिरांमध्ये एकूण २४४ युवक व युवतींनी सहभाग घेतला. त्यापैकी १४४ जणांनी प्रशिक्षण यशस्वीरीत्या पूर्ण केल्याने त्यांना प्रशस्तीपत्रके प्रदान करण्यात आली. स्वसंरक्षणाच्या विविध तंत्रांसह मानसिक सक्षमीकरण, प्रसंगावधान आणि संकटसमयी योग्य निर्णय घेण्याचे प्रशिक्षण शिबिरात देण्यात आले.

### फादर्स डे निमित्त वडिलांसाठी उपयुक्त आणि आकर्षक भेटवस्तूंचा खास संग्रह



पुणे (स. गांवकरी) : वडिलांसाठी योग्य भेटवस्तू निवडणे अनेकदा आव्हानात्मक ठरते. ते सहसा स्वतःसाठी काही मागत नाहीत आणि आपल्या आवडीच्या वस्तूंनाच प्राधान्य देतात. अशा वेळी फॅशनशी संबंधित उपयुक्त भेटवस्तू हा विचारपूर्वक आणि उपयोगी पर्याय ठरू शकतो. याच पार्श्वभूमीवर नायका फॅशनने फादर्स डे निमित्त पुरुषांसाठी वस्त्रे, पादत्राणे आणि पूरक वस्तूंचा विशेष संग्रह सादर केला आहे. काही वस्तू अशा असतात ज्या काळानुसार बदलणाऱ्या प्रवाहांपासून दूर राहून कायम लोकप्रिय ठरतात. उत्तम बसणारे शर्ट, पारंपरिक शैलीतील अर्धबाह्यांचे टी-शर्ट तसेच आरामदायी तागाच्या कापडातील वस्त्रे कोणत्याही व्यक्तीच्या कपाटात सहज स्थान मिळवतात. हलक्या कापडांचा वापर, आकर्षक रचना आणि विविध प्रसंगांना साजेसे रंग यामुळे हे पर्याय कौटुंबिक समारंभांपासून दैनंदिन वापरापर्यंत उपयुक्त ठरतात. फादर्स डेचा आनंद अनेक कुटुंबांमध्ये दिवसभर साजरा केला जातो. त्यामुळे आराम आणि देखणेपणा यांचा समतोल साधणाऱ्या वस्तूंना विशेष महत्त्व असते. आरामदायी पादत्राणे, सहज परिधान करता येणारी वस्त्रे आणि दैनंदिन वापरातील आवश्यक वस्तू या शैली आणि सोयीचे उत्तम मिश्रण ठरतात. यंदाच्या हंगामात विविध प्रसंगांसाठी सहज वापरता येतील अशा वस्तूंना अधिक पसंती मिळत आहे.



### सुभद्राबाई पोकळे यांचे निधन

श्रीगोंदा (स. गांवकरी) : तालुक्यातील पिंप्री स्टेशन (म्हातारपिंप्री) येथील सुभद्राबाई तुकाराम पोकळे यांचे वृद्धापकाळाने निधन झाले. त्या ९८ वर्षांच्या होत्या. सुभद्राबाईंनी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत कष्टपूर्वक संसार उभा करत आपल्या कुटुंबावर उत्तम संस्कार केले. त्यांच्या कार्यामुळे पोकळे कुटुंब सामाजिक क्षेत्रातही ओळखले जाते. त्या प्रहार दिव्यांग संघटनेचे श्रीगोंदा तालुकाध्यक्ष राजेंद्र पोकळे यांच्या मातोश्री होत. त्यांच्या पश्चात पाच मुले, एक मुलगी, सुना, नातवंडे असा मोठा परिवार आहे. त्यांच्या निधनाने परिसरात हळहळ व्यक्त होत असून विविध क्षेत्रातील मान्यवरांनी पोकळे कुटुंबीयांची भेट घेऊन सांत्वन केले.

### अधिक मासानिमित्त स्वामी समर्थ मंदिरात भव्य विष्णुयाग सोहळा

अहिल्यानगर (स. गांवकरी) : अधिक मास अर्थात पुरुषोत्तम मासानिमित्त श्री गुरुचरित्र सत्संग परिवाराच्या वतीने सावेडी उपनगरात स्वामी समर्थ मंदिर, सावली सोसायटी, गुलमोहोर रोड येथे आयोजित करण्यात आलेला भव्य विष्णुयाग सोहळा रविवारी अत्यंत भक्तिमय आणि मंगलमय वातावरणात उत्साहात संपन्न झाला. या धार्मिक सोहळ्यास शहरातील तसेच परिसरातील असंख्य भाविक भक्तांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून विविध धार्मिक विधींचा लाभ घेतला. हिंदू धर्मशास्त्रानुसार अधिक मास हा भगवान विष्णूंना समर्पित असून या महिन्यात केलेली उपासना, जप, तप, दानधर्म व धार्मिक विधी अनेक पटींनी फलदायी ठरतात.

# एनसीसी कॅडेट्सची भारतीय सैन्य दलात भरारी

श्रीगोंदा : (स. गांवकरी)

रयत शिक्षण संस्थेच्या महाराजा जिवाजीराव शिंदे महाविद्यालयातील राष्ट्रीय छात्र सेना (NCC) विभागाच्या चार कॅडेट्सची भारतीय सैन्य दलात, तर कबड्डीपटू तुषार भोसले यांची महाराष्ट्र पोलीस दलात निवड झाल्याने महाविद्यालयाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे. या यशस्वी विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ महाविद्यालयात उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.




भारतीय सैन्य दलात निवड झालेल्या सिनिअर अंडर ऑफिसर करण राणेरजपूत, ज्युनिअर अंडर ऑफिसर स्वप्निल जामदार, कॅडेट अर्जुन धोत्रे आणि कॅडेट साहिल ससाणे यांचा गौरव महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. प्रकाश साळवे, वाणिज्य विभाग प्रमुख डॉ. रावसाहेब काळे, कनिष्ठ विभागाचे उपप्राचार्य प्रा. श्रीकांत थोरात तसेच पर्यवेक्षक रत्नाकर झिटे यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी मार्गदर्शन करताना प्राचार्य डॉ. प्रकाश साळवे म्हणाले, "भारतीय सैन्य दलात सेवा करण्याची संधी ही केवळ नोकरी नसून राष्ट्रसेवेचे सर्वोच्च कर्तव्य आहे. एनसीसी विद्यार्थ्यांमध्ये शिस्त, नेतृत्व, आत्मविश्वास, संघभावना आणि देशभक्तीची मूल्ये रुजवते. महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी या यशस्वी कॅडेट्सचा आदर्श घेऊन आपल्या ध्येयासाठी सातत्याने प्रयत्न करावेत. कठोर परिश्रम, चिकाटी आणि सकारात्मक दृष्टिकोन यांच्या बळावर कोणतेही यश प्राप्त करता येते." त्यांनी पुढे सांगितले की, या विद्यार्थ्यांचे यश संपूर्ण महाविद्यालयासाठी प्रेरणादायी असून भविष्यात आणखी विद्यार्थी सैन्य, पोलीस, निमलष्करी दल तसेच विविध स्पर्धा परीक्षांमध्ये यश संपादन करतील, असा विश्वास आहे.

या प्रसंगी महाविद्यालय विकास समितीचे चेअरमन तथा माजी आमदार बबनरावजी पाचपुते, मॅनेजिंग कौन्सिल सदस्य व महाविद्यालय विकास समितीचे सदस्य बाबासाहेब भोस, माजी आमदार राहुल जगताप, महावीर पटवा, प्राचार्य डॉ. प्रकाश साळवे, उपप्राचार्य डॉ. सुदाम भुजबळ, डॉ. नितीन थोरात, जिमखाना प्रमुख प्रा. रमेश थोरात, क्रीडा शिक्षक संजय डफळ आदींनी निवड झालेल्या विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून त्यांच्या उज्ज्वल भवितव्यास शुभेच्छा दिल्या.

तसेच 17 महाराष्ट्र बटालियन एनसीसी, अहिल्यानगरचे कमांडिंग ऑफिसर कर्नल प्रसाद मिजार आणि अॅडमिन ऑफिसर कर्नल निकेतसिंग नेगी यांनीही निवड झालेल्या कॅडेट्सचे विशेष कौतुक केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कॅडेट अनुराधा शिंदे यांनी केले. कार्यक्रमाच्या शेवटी एनसीसी विभाग प्रमुख तथा सीटीओ डॉ. किरण ढवळे यांनी उपस्थित मान्यवर, शिक्षकवृंद आणि विद्यार्थ्यांचे आभार मानले. भारतीय सैन्य दलात निवड झालेल्या चार कॅडेट्स आणि महाराष्ट्र पोलीस दलात निवड झालेल्या तुषार भोसले यांच्या यशामुळे महाविद्यालयाच्या एनसीसी व क्रीडा विभागाचा गौरव वाढला असून त्यांच्या कामगिरीमुळे इतर विद्यार्थ्यांनाही देशसेवेची प्रेरणा मिळाली आहे.

## श्रीगोंद्यात प्रथमच शिवराज्याभिषेक सोहळा उत्साहात संपन्न

श्रीगोंदा : (स. गांवकरी)

मराठा सेवा संघ आणि संभाजी ब्रिगेड पक्ष यांच्या संयुक्त विद्यमाने शनी चौक, श्रीगोंदा येथे छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेक दिनानिमित्त प्रथमच भव्य शिवराज्याभिषेक सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. छत्रपती शिवाजी महाराजांच्या मूर्तीला अभिषेक करून हा सोहळा उत्साहपूर्ण आणि भक्तिमय वातावरणात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाचे नियोजन संभाजी ब्रिगेडचे तालुकाध्यक्ष शामभाऊ जरे यांनी केले. प्रारंभी मराठा सेवा संघाचे तालुकाध्यक्ष प्रा. सुनील गायकवाड यांनी प्रास्ताविकातून शिवराज्याभिषेकाचे ऐतिहासिक महत्त्व अधोरेखित केले. सोहळ्यात ह.भ.प. संपत महाराज लांडगे यांच्या हस्ते विधिवत राज्याभिषेक पूजा संपन्न झाली. तसेच संभाजी ब्रिगेडचे तालुका उपाध्यक्ष दिलीप लबडे




आणि त्यांच्या धर्मपत्नी यांनी सपत्नीक पूजाविधी करून छत्रपती शिवाजी महाराजांना अभिवादन केले. यावेळी प्रसिद्ध लेखक व व्याख्याते महेंद्र मिसाळ, प्रा. खरसडे आणि प्रा. सचिन झगडे यांनी उपस्थितांना शिवचरित्र, शिवविचार आणि स्वराज्याच्या संकल्पनेविषयी मार्गदर्शन केले. कार्यक्रमास छत्रपती संभाजी महाराज सेवा समितीचे जिल्हा उपाध्यक्ष आनंद लगड, माजी नगराध्यक्ष मनोहरदादा पोटे, संभाजी ब्रिगेडचे संतोष आरडे (मेजर), घनश्याम काळे, यशवंत सेनेचे संस्थापक अध्यक्ष आदेश शेंडगे, छत्रपती शिवाजी महाराज जयंती उत्सव समितीचे सदस्य दीपक मखरे यांच्यासह विविध सामाजिक, शैक्षणिक आणि राजकीय क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

## आर्थिक साक्षरता व ग्राहक जागरूकता मेळावा उत्साहात

श्रीगोंदा : (स. गांवकरी)

डॉक्टर, अभियंता, सीए यांसारख्या व्यावसायिक अभ्यासक्रमांची व्यवस्था असली तरी गुंतवणूकदार घडविण्यासाठी कोणताही स्वतंत्र अभ्यासक्रम नसल्याने अनेक शिक्षित व अशिक्षित नागरिक अधिक परताव्याच्या आमिषाला बळी पडून आर्थिक फसवणुकीचे शिकार होतात. हे चित्र बदलण्यासाठी घराघरांत आर्थिक विषयांवर खुली चर्चा होणे आणि वृत्तपत्र वाचनाची सवय लागणे आवश्यक असल्याचे प्रतिपादन देशपांडे इन्व्हेस्टमेंटचे संचालक तथा आर्थिक कौशल्य विकास अभियानाचे समन्वयक राजेश देशपांडे यांनी केले.

येथील वृद्धेश्वर अर्बन मल्टिस्टेट को-ऑपरेटिव्ह सोसायटीच्या १३ व्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित आर्थिक सुरक्षा व ग्राहक जागरूकता मेळावा तसेच दहावी-बारावीतील विशेष प्रावीण्य मिळविलेल्या विद्यार्थ्यांच्या गुणगौरव सोहळ्यात




वृद्धेश्वर अर्बन मल्टिस्टेटच्या वर्धापन दिनानिमित्त गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव

ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नगराध्यक्षा सौ. सुनीता खेतमाळीस होत्या.

राजेश देशपांडे पुढे म्हणाले की, झटपट श्रीमंत होता येत नाही. रिझर्व्ह बँक व इतर शासकीय वित्तीय संस्थांकडून सातत्याने जनजागृती केली जात असतानाही अनेक गुंतवणूकदार विविध भूलथापांना बळी पडतात. ही समस्या केवळ भारतापुरती मर्यादित नसून जागतिक स्वरूपाची आहे. जीवनात पैशाचे महत्त्व अनन्यसाधारण असून बचतीची सवय लागणे आवश्यक आहे. आपला पैसा कोणत्या संस्थेत आणि कशा प्रकारे गुंतवला जातो, याची माहिती प्रत्येकाने ठेवली पाहिजे. आर्थिक साक्षरतेसाठी शाळांमध्येही मार्गदर्शन होणे गरजेचे आहे. वृद्धेश्वर अर्बन मल्टिस्टेट सोसायटीने गरीब घटकांना केंद्रबिंदू मानून काम केल्यामुळे संस्थेची उल्लेखनीय प्रगती झाली आहे. संस्थापक विठ्ठलराव वाडगे यांनी सामाजिक बांधिलकी जपत संस्था उभी केली असून त्यांचा आदर्श इतरांनी घ्यावा. अशा संस्था मोठ्या प्रमाणात उभ्या राहिल्यास राज्याच्या आर्थिक प्रगतीला चालना मिळेल, असेही त्यांनी सांगितले. यावेळी संस्थेच्या अध्यक्षा सौ. सायली वाडगे यांनी सांगितले की, विठ्ठलराव वाडगे यांनी एका मित्राला उपचारासाठी भेडसावणारी आर्थिक अडचण पाहून गरीबांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्याच्या उद्देशाने वृद्धेश्वर मल्टिस्टेटची स्थापना केली. गेल्या १३ वर्षांत संस्थेच्या १३ शाखा सुरू करण्यात आल्या आहेत. महिला बचत गट, खाजगी कृषी उत्पन्न बाजार समिती तसेच गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक मदत यांसारख्या उपक्रमांमुळे संस्था लोकांच्या पसंतीस उतरली असून भविष्यातही ग्राहकांना अधिकाधिक सेवा देण्याचा मानस असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. कार्यक्रमात ठेवीदारांसाठी प्रोत्साहनपर भेटवस्तूंची लॉटरी काढण्यात आली. त्यामध्ये निकेश काटे यांना चांदीचे नाणे, किसन सप्रे यांना पॉवर बँक तर मनीषा वाल्हेकर यांना इलेक्ट्रिक केटल प्रदान करण्यात आली. तसेच दहावीच्या बोर्ड परीक्षेत ९८.२० टक्के गुण मिळवून तालुक्यात प्रथम क्रमांक पटकावणाऱ्या पूर्वा युवराज रणसिंग हिच्यासह गुणवंत विद्यार्थी-विद्यार्थिनींचा व त्यांच्या पालकांचा सत्कार करण्यात आला.

## ५ ग्रामसेवकांसह एका कर्मचाऱ्याला सेवानिवृत्तीचा निरोप

श्रीगोंदा : (स. गांवकरी)

ज्येष्ठ ग्रामपंचायत अधिकारी लक्ष्मण मुरकुटे यांच्यासह प्रदीर्घ व कर्तव्यनिष्ठ सेवा बजावून सेवानिवृत्त झालेल्या ग्रामपंचायत अधिकारी व कर्मचाऱ्यांचा सेवापूर्ती सत्कार व निरोप समारंभ शुक्रवारी तुळशीदास मंगल कार्यालय, श्रीगोंदा येथे उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.

या समारंभात ज्येष्ठ मार्गदर्शक कुंडलिक भगत, माजी जिल्हाध्यक्ष ग्रामपंचायत अधिकारी संघाचे भाऊसाहेब माने, भाऊसाहेब साबळे, भाऊसाहेब बेरड, भाऊसाहेब जगदाळे तसेच कर्मचारी अहमद इनामदार (चाचा) यांचा गौरव करण्यात आला. तसेच अहिल्यानगर जिल्ह्यातून बारामती येथे बदली झालेल्या ग्रामपंचायत अधिकारी अनिल जगताप यांनाही निरोप देण्यात आला. कार्यक्रमासाठी माजी मंत्री बबनराव पाचपुते यांच्या शुभेच्छा प्राप्त झाल्या असून त्यांच्या धर्मपत्नी डॉ. प्रतिभाताई पाचपुते प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या.



श्रीगोंद्यात सेवापूर्ती सत्कार व निरोप समारंभ उत्साहात संपन्न

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्रीगोंदा पंचायत समितीच्या गटविकास अधिकारी राणीताई फराटे होत्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन छत्रपती शिवाजी राजे ग्रामपंचायत अधिकारी पतसंस्थेचे संचालक नवनाथ गोरे यांनी केले. प्रास्ताविक राजेंद्र दराडे आणि कोमलकुमार कांबळे यांनी केले. यावेळी सत्कारमूर्ती अनिल जगताप व लक्ष्मण मुरकुटे यांच्यासह कुंडलिक भगत, भाऊसाहेब माने, भाऊसाहेब साबळे, भाऊसाहेब बेरड, भाऊसाहेब जगदाळे आणि अहमद इनामदार यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. समारंभाला विविध गावांतील सरपंच, उपसरपंच, पंचायत समिती सदस्य, जालिंदर कुरुमकर, दौंड येथील ग्रामपंचायत अधिकारी तथा यशदा मास्टर ट्रेनर अमीर शेख, नागवडे कारखान्याचे माजी संचालक बंडोपंत पंधरकर, विस्तार अधिकारी बनकर, ग्रामपंचायत अधिकारी अश्विनी व्यवहारे तसेच ॲड. सोनाली माने यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

मनोगत व्यक्त करताना अनिल जगताप आणि लक्ष्मण मुरकुटे यांनी आपल्या सेवाकाळातील आठवणींना उजाळा दिला. डॉ. प्रतिभाताई पाचपुते यांनी ग्रामपंचायत अधिकाऱ्यांच्या अडीअडचणींमध्ये पाचपुते कुटुंब कायम पाठीशी राहील, अशी ग्वाही दिली. तसेच माजी मंत्री बबनराव पाचपुते आणि आमदार विक्रम पाचपुते यांच्या वतीनेही शुभेच्छा देण्यात आल्या. कार्यक्रमास विस्तार अधिकारी हराळ, वाघ, खोसे, मांढरे, मालजप्ते, शाखा अभियंता कुताळ, ग्रामपंचायत अधिकारी संघाचे तालुकाध्यक्ष साहेबराव घोरपडे, कार्याध्यक्ष कोमलकुमार कांबळे, राज्य संघटक राजीव दराडे यांच्यासह तालुक्यातील अनेक ग्रामपंचायत अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. समारोपप्रसंगी अहमदनगर जिल्हा ग्रामपंचायत अधिकारी संघाचे अध्यक्ष किशोर जेजुरकर यांनी उपस्थितांचे आभार मानले.

*वसुंधरा अकॅडेमीच्या इयत्ता*

## आठवीच्या समर्थ महालेची नवोदय विद्यालयासाठी निवड

अकोले : (स. गांवकरी)

अभिनव शिक्षण संस्था संचलित वसुंधरा अकॅडमीचा इयत्ता ८ वीचा विद्यार्थी समर्थ विलास महाले या विद्यार्थ्याची नवोदय परीक्षेतून इयत्ता ९ वी प्रवेशासाठी जवाहर नवोदय विद्यालय, टाकळी ढोकेश्वर येथे निवड झाली आहे. या निवड प्रक्रियेच्या प्रथम फेरीत सुमारे 545 विद्यार्थ्यांमधून समर्थ महाले याने तृतीय क्रमांक प्राप्त केला आहे. त्याच्या या उल्लेखनीय यशामुळे वसुंधरा अकॅडेमी तसेच अकोले तालुक्याचे नाव उज्ज्वल झाले आहे.



समर्थच्या या यशाबद्दल समर्थ व त्याचे आई-वडील यांचे अभिनव शिक्षण संस्थेचे संस्थापक अध्यक्ष मधुकरराव नवले, कोषाध्यक्ष तथा वसुंधरा अकॅडेमीच्या प्राचार्य डॉ.जयश्री देशमुख, सचिव विक्रम नवले, सहसचिव अल्फोन्सा.डी, सर्व संचालक मंडळ, उपप्राचार्य राधिका नवले व वसुंधरा अकॅडमीचे सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन केले. त्याचबरोबर समर्थला त्याच्या उज्ज्वल भविष्यासाठी मनःपूर्वक शुभेच्छा व्यक्त करण्यात येत आहेत.

## भारतीय संस्कृती केवळ भारतातच नव्हे तर भारताबाहेरही प्रभावी - डॉ. गो. बं. देगलूरकर

- 'सुवर्णद्वीप' पुस्तकाचे पुण्यात प्रकाशन
- इंडोनेशियातील भारतीय संस्कृतीच्या वारशावर प्रकाश



पुणे : (स. गांवकरी)

भारतीय संस्कृती केवळ भारतातच नव्हे तर भारताबाहेरही प्रभावी असल्याचे उत्तम उदाहरण इंडोनेशिया या देशावरून दिसून येते. आम्ही धर्माने मुस्लिम असलो. तरी संस्कृतीने हिंदू आहोत," असे इंडोनेशियाच्या परराष्ट्र मंत्र्यांनी अभिमानाने सांगितल्याचे ज्येष्ठ पुरातत्व तज्ज्ञ डॉ. गो. बं. देगलूरकर यांनी नमूद केले. प्राचीन इंडोनेशियातील हिंदू-बौद्ध संस्कृती, परंपरा आणि राजसत्तेचा इतिहास उलगडणाऱ्या 'सुवर्णद्वीप : हिंदू बुद्धीस्ट किंग्डम्स् ऑफ एन्शंट इंडोनेशिया' या पुस्तकाचे प्रकाशन भांडारकर ओरिएंटल रिसर्च इन्स्टिट्यूट येथे आयसीएचआरचे माजी अध्यक्ष डॉ. ए. पी. जामखेडकर यांच्या हस्ते आणि डेक्कन कॉलेजचे माजी कुलगुरू डॉ. गो. बं.देगलूरकर यांच्या अध्यक्षतेखाली पार पडले. पुस्तकाच्या लेखिका संगीता चाफेकर आणि ऋता उंबरजे, डॉ. अंबरीष खरे, विभा ओक, प्रकाशक पराग पुरंदरे आदि मान्यवर उपस्थित होते. अध्यक्षीय भाषणात डॉ. गो. बं. देगलूरकर यांनी भारतीय संस्कृतीच्या जागतिक प्रभावाची अनेक उदाहरणे दिली. इंडोनेशियातील सांस्कृतिक जीवनात रामायण आणि महाभारत आजही जिवंत असल्याचे त्यांनी नमूद केले. त्यांनी महर्षी अगस्तींच्या इंडोनेशियातील कार्याचा तसेच स्वातंत्र्यवीर सावरकर आणि माजी पंतप्रधान अटल बिहारी वाजपेयी यांच्या इंडोनेशियाशी संबंधित आठवणींचाही उल्लेख केला.

डॉ. जामखेडकर यांनी इंडोनेशियातील मंदिरांबद्दल लोकांच्या मनात आजही असलेली पावित्र्याची भावना अधोरेखित केली. इस्लामधर्मीय बहुसंख्य देश असूनही तेथील हिंदू मंदिरांचे संवर्धन आणि जतन करण्यात आले आहे. दक्षिण-पूर्व आशियातील भारतीय संस्कृतीच्या प्रभावाचा अभ्यास करताना काही पाश्चात्त्य इतिहासकारांनी या प्रदेशाला 'इंडियनाइज्ड स्टेट्स ऑफ साउथ-ईस्ट एशिया' असे संबोधल्याचा उल्लेख त्यांनी केला. संगीता चाफेकर यांनी सांगितले की, भारतीय संस्कृतीचा प्रसार हा आक्रमणातून नव्हे तर व्यापार, धर्म, तत्त्वज्ञान, कला आणि सांस्कृतिक देवाणघेवाणीद्वारे झाला. भारतीय व्यापारी आणि विद्वानांनी आग्नेय आशियात विचार व परंपरा पोहोचवल्या. स्थानिक संस्कृतींसोबत झालेल्या संवादातून तेथे एक स्वतंत्र आणि वैशिष्ट्यपूर्ण सांस्कृतिक परंपरा विकसित झाली. भारतीय संस्कृती ही संवाद साधणारी असून ती कोणावरही लादली जात नाही, असे त्यांनी नमूद केले.

ऋता उंबरजे यांनी जावा आणि बाली बेटांवरील भारतीय संस्कृतीच्या प्रभावाची उदाहरणे दिली. रामायण, महाभारत आणि पुराणकथांतील मूळ भारतीय संकल्पना स्थानिक समाजाने स्वीकारून आपल्या सांस्कृतिक संदर्भात त्यांचे रूपांतर केले. पात्रांची नावे आणि काही तपशील बदलले असले तरी मूळ विचार भारतीय असल्याचे त्यांनी सांगितले. जावा येथील मंदिरांमध्ये रामायणाचे भव्य शिल्परूप दर्शन घडते, असेही त्यांनी नमूद केले.

डॉ. अंबरीष खरे यांनी इंडोनेशियाचा अभ्यास करताना तेथील भाषा, कला, स्थापत्य, शिलालेख, इतिहास आणि भूगोलाचा सखोल अभ्यास केल्याचे सांगितले. इंडोनेशियामध्ये आजही भारतीय संस्कृतीचा प्रभाव अनेक ठिकाणी जाणवतो. देशाचे राष्ट्रीय प्रतीक 'गरुड' असून त्यावरूनच राष्ट्रीय विमानसेवा 'गरुडा'चे नाव ठेवण्यात आले आहे. इस्लाम धर्म स्वीकारलेल्या अनेक कुटुंबांमध्येही हिंदू परंपरेबद्दल आदरभाव असून भगवद्गीतेसारख्या ग्रंथांची ओळख नव्या पिढीला करून दिली जाते, असे त्यांनी सांगितले.

## थोडक्यात पण महत्वाचे



### टी.ए. पाटील इंग्रजी शाळेतील दहावी उत्तीर्ण विद्यार्थ्यांचा सत्कार

भिवंडी (स. गांवकरी) : पडघा परिसरातील टी.ए. पाटील इंग्रजी शाळेने यंदाही उत्कृष्ट निकालाची परंपरा कायम राखत दहावीच्या परीक्षेत १०० टक्के निकालाची नोंद केली आहे. शाळेने गेल्या १५ वर्षांपासून सातत्याने १०० टक्के निकाल देत शैक्षणिक गुणवत्तेची वेगळी छाप निर्माण केली आहे. यावर्षीच्या दहावीच्या परीक्षेत शाळेतील स्नेहा श्याम नवलखेरे हिने ९२.६० टक्के गुण मिळवत प्रथम क्रमांक पटकावला. धनश्री शशिकांत भोईर हिने ९२.२० टक्के गुण मिळवत द्वितीय क्रमांक प्राप्त केला. तर गीता चोपाराम चौधरी आणि श्रेयश आनंदराव मोरे यांनी प्रत्येकी ९०.६० टक्के गुण मिळवत संयुक्तरीत्या तृतीय क्रमांक मिळविला. या गुणवंत विद्यार्थ्यांचा शाळा व्यवस्थापनाच्या वतीने सत्कार करण्यात आला. विद्यार्थ्यांच्या या यशामुळे शिक्षक, पालक आणि व्यवस्थापनामध्ये आनंद व समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे. विद्यार्थ्यांच्या यशामागे शिक्षकांचे मार्गदर्शन, सातत्यपूर्ण परिश्रम, पालकांचे सहकार्य तसेच विद्यार्थ्यांची मेहनत, जिद्द आणि चिकाटी यांचा मोठा वाटा असल्याचे यावेळी सांगण्यात आले. शिक्षणाबाबतची निष्ठा, शिक्षकांचे मार्गदर्शन, व्यवस्थापनाचे पाठबळ आणि मुख्याध्यापकांचे मोलाचे सहकार्य यामुळे विद्यार्थ्यांनी हे यश संपादन केल्याची भावना शाळा व्यवस्थापनाने व्यक्त केली.टी.ए. पाटील इंग्रजी शाळेच्या या यशामुळे पडघा परिसरातील विद्यार्थ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून गुणवंत विद्यार्थ्यांवर सर्व स्तरांतून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. शाळेच्या सातत्यपूर्ण यशामुळे परिसरातील विद्यार्थ्यांना प्रेरणा मिळत असून शाळेच्या शैक्षणिक कार्याचे सर्वत्र कौतुक केले जात आहे.

### महाराष्ट्रात मान्सूनची धडाकेबाज एन्ट्री, २५ जिल्ह्यांना अलर्ट



अहिल्यानगर (स. गांवकरी) : नैऋत्य मान्सूनने शनिवारी तळकोकणात प्रवेश करत महाराष्ट्रातील पावसाळ्याची अधिकृत सुरुवात केली. मान्सूनच्या पुढील वाटचालीस वातावरण अनुकूल असल्याने तो लवकरच राज्याच्या उर्वरित भागातही दाखल होण्याची शक्यता आहे. दरम्यान, भारतीय हवामान विभागाने (IMD) पुढील ४८ तास राज्यातील अनेक भागांत मुसळधार पाऊस, मेघगर्जना आणि वादळी वाऱ्यांचा इशारा दिला आहे. हवामान विभागाच्या अंदाजानुसार, रविवारी राज्यातील २५ जिल्ह्यांना 'यलो अलर्ट' जारी करण्यात आला असून सोमवारी २१ जिल्ह्यांसाठी यलो, तर सहा जिल्ह्यांसाठी 'ऑरेंज अलर्ट' घोषित करण्यात आला आहे. दक्षिण कोकण, गोवा आणि दक्षिण मध्य महाराष्ट्रातील काही भागांत वादळी वाऱ्यांसह मुसळधार पाऊस होण्याची शक्यता वर्तविण्यात आली आहे. या भागांत ताशी ४० ते ५० किलोमीटर वेगाने वारे वाहण्याचा अंदाज असून विजांच्या कडकडाटासह पावसाची जोरदार हजेरी लागण्याची शक्यता आहे. उत्तर कोकण, उत्तर महाराष्ट्र आणि मराठवाड्यातील काही भागांत हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पावसासह मेघगर्जना आणि विजांचा कडकडाट होण्याची शक्यता आहे. या भागांतही ताशी ४० ते ५० किलोमीटर वेगाने वारे वाहू शकतात. त्यामुळे नागरिकांनी सावधगिरी बाळगावी, असे आवाहन हवामान विभागाने केले आहे.

### नगरसेवक महेश लोंढे यांचा खासदार निलेश लंके यांना अप्रत्यक्ष टोला



अहिल्यानगर (स. गांवकरी) : नगर -कल्याण रोडवरील अमरधाम परिसरातील सीना नदीवरील उड्डाणपुलाच्या स्लॅब कामाचा शुभारंभ आज दि. ६ जून नगरसेवक महेश लोंढे व नगरसेवक दत्ता गाडळकर यांच्या उपस्थितीत करण्यात आला. यावेळी बोलताना महेश लोंढे यांनी नाव न घेता खासदार निलेश लंके यांच्यावर निशाणा साधला. "हे काम माजी खासदार डॉ. सुजय विखे पाटील यांच्या विकास निधीतून आणि त्यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे सुरू झाले आहे. त्यामुळे या कामाचे श्रेय घेण्यासाठी काही जणांनी केवळ फोटोसेशन करू नये," असा टोला त्यांनी लगावला. सुमारे दीड वर्षांपूर्वी सुरू झालेल्या या कामासाठी डॉ. सुजय विखे पाटील आणि आमदार संग्राम जगताप यांनी मोठा पाठपुरावा केल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. काही दिवसांपूर्वी पुलाच्या ठिकाणी भेट देत फोटोसेशन करण्यात आले होते. त्यानंतर श्रेयवादाच्या चर्चांना उधाण आले असून, आजच्या कार्यक्रमातून त्यावर अप्रत्यक्षपणे उत्तर देण्यात आले. या प्रसंगी नगरसेवक दत्ता गाडळकर, सामाजिक कार्यकर्ते अभिजीत बोरुडे, भगवानराव काटे, हरीभाऊ यलदांडी, शरद दातरांगे, सागर अडसूळ, बालाजी रायपेल्ली, अभिषेक बाबर, ओंकार जेटला आदी उपस्थित होते.



### कल्याण रोड येथील गणेशनगर येथे चोरट्यांचा सुळसुळाट

अहिल्यानगर (स. गांवकरी) : कल्याण रोड परिसरातील गणेश नगर भागात दि.५जून रोजी पहाटेच्या 2.30 वाजण्याच्या दरम्यान स्वप्निल अंकम यांच्या घरी चार चोर आले होते.परंतु अंकम यांच्या सतर्कतेमुळे व आरडा ओरडा केल्यामुळे ते चोर पळून गेले.चोरट्यांनी पळून जाताना दगडफेक केली.या घटनेचे व्हिडिओ तोफखाना पोलीस स्टेशन येथे देण्यात आले आहेत. या चोरट्यामूळे गणेशनगर, कल्याणरोड,विठ्ठल रुक्मीणी मंदीरासमोरील भाग या सर्व परिसरात मोठे भितीचे वातावरण निर्माण झालेले आहे. परिसरातील लोकांच्या जिवीतास भय निर्माण झाले आहे.सदरील परिसरात पोलीसांची गस्त नाही.तरी गणेशनगर परिसरात पोलीसांनी पेट्रोलींग गस्त वाढवावी यावी.याबाबतचे निवेदन गणेशनगर येथील नागरिकांच्या वतीने देण्यात आले.याप्रसंगी गणेशनगर सोसायटीचे चेअरमन गणेश शिंदे,स्वप्निल अंकम, अमोल भांबरकर,नरेश श्रीपत,मनोहर संदुपटला, योगेश दिवाने,शंकर गायकवाड,अंबादास दोंता,अर्जुन नेवसे, राहुल शर्मा आदी उपस्थित होते. तसेच सदर परिसरात अनेक वेळा छोटया मोठ्या चो-या झालेले आहेत. तरी या ठिकाणी आलेल्या चोरांचा लवकरात लवकर शोध घेवुन योग्य तो बंदोबस्त करावा.

# प्रणिती शिंदे यांनी शेतकऱ्यांना झटका मशीनचे केले वाटप






सोलापूर : (स. गांवकरी)

वन्यप्राण्यांपासून शेतकऱ्यांच्या पिकांच्या संरक्षणासाठी खासदार प्रणिती शिंदे यांचा पुढाकार; सीएसआर फंडातून अल्पभूधारक शेतकऱ्यांना झटका मशीनचे वाटप करण्यात आले.

उत्तर सोलापूर तालुक्यातील वन्यप्राण्यांच्या वाढत्या उपद्रवामुळे शेतकऱ्यांच्या पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत आहे. विशेषतः नान्नज अभयारण्य परिसरातील गावांमध्ये शेतकऱ्यांना या समस्येचा सातत्याने सामना करावा लागत आहे. या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांच्या पिकांचे संरक्षण व्हावे आणि त्यांचे आर्थिक नुकसान टाळता यावे, या उद्देशाने खासदार प्रणिती शिंदे यांच्या पुढाकारातून सीएसआर निधीच्या माध्यमातून गरीब व गरजू अल्पभूधारक शेतकऱ्यांना मोफत झटका मशीनचे वाटप करण्यात आले. गुळवंची येथे आयोजित कार्यक्रमात नान्नज, कोंडी, बाणेगाव, मार्डी आणि कारंबा या गावांतील अल्पभूधारक शेतकऱ्यांना खासदार प्रणिती शिंदे यांच्या हस्ते झटका मशीनचे वितरण करण्यात आले. यामध्ये नान्नज येथील संतोष चोपडे, कोंडी येथील सदाशिव भोसले, बाणेगाव येथील हनुमंत लक्ष्मण आतकरे, मार्डी येथील भगवान नामदेव कदम आणि कारंबा येथील लक्ष्मण माने या शेतकऱ्यांचा समावेश होता. यावेळी बोलताना खासदार प्रणिती शिंदे यांनी सांगितले की, श्यामाप्रसाद योजनेअंतर्गत उत्तर सोलापूर तालुक्यातील शेतकऱ्यांना वन्यप्राण्यांपासून पिकांचे संरक्षण करण्यासाठी झटका मशीन उपलब्ध करून देण्याबाबत केंद्र सरकारकडे प्रस्ताव सादर करण्यात आले आहेत. मात्र हे प्रस्ताव अद्याप प्रलंबित आहेत. शासनाकडून आवश्यक यंत्रणा उपलब्ध होण्यास विलंब होत असल्याने शेतकऱ्यांची अडचण लक्षात घेऊन प्राथमिक स्वरूपात सीएसआर फंडातून झटका मशीन खरेदी करून त्यांचे वाटप करण्यात येत आहे. तसेच वन्यप्राण्यांमुळे शेतीचे होणारे नुकसान हा गंभीर प्रश्न असून याबाबत संसदेत आवाज उठवून शेतकऱ्यांना झटका मशीन आणि इतर आवश्यक संरक्षणात्मक सुविधा, नुकसान भरपाई तातडीने उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्नशील राहणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

या झटका मशीनमुळे जंगली प्राण्यांपासून शेतकऱ्यांच्या पिकांचे संरक्षण होण्यास मदत होणार असून पिकांचे नुकसान कमी करून शेतकऱ्यांचे आर्थिक हित जपले जाणार आहे. शेतीची सुरक्षितता वाढविण्यासाठी आणि शेतकऱ्यांच्या मेहनतीने उभ्या केलेल्या पिकांचे रक्षण करण्यासाठी हा उपक्रम महत्त्वपूर्ण ठरणार असल्याचे मत यावेळी व्यक्त करण्यात आले.

याप्रसंगी उत्तर सोलापूर तालुका काँग्रेसचे अध्यक्ष भारत जाधव, जिल्हा समन्वयक मनोज एल्गुलवार, संजय पोळ, सचिन गुंड, शुभम शिराळ, विनायक भोसले, अमोल पांढरे, राजू शिंदे, सोमनाथ भोसले, सागर राठोड, मनोरंजन जाधव यांच्यासह शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## दिनानिमित्त जुन्नरमध्ये विविध कार्यक्रमांचे आयोजन

खोडद : (स. गांवकरी)

शिवजन्मभूमी जुन्नर मध्ये शिवराज्याभिषेक दिनानिमित्त शनिवारी विविध ऐतिहासिक, सांस्कृतिक आणि सामाजिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. जुन्नर आणि लगतच्या परिसरातील शिवप्रेमींच्या वतीने स्थानिक गड-किल्ल्यांवर शिवराज्याभिषेक सोहळे मोठ्या उत्साहात साजरे केले जातात.शिवजन्मभूमी असलेल्या किल्ले शिवनेरीवर पहाटे सूर्योदयाच्या वेळी गडपूजन, पालखी सोहळा आणि छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याला जलाभिषेक व दुग्धाभिषेक केला जातो. यानिमित्त शिवनेरी गडाच्या पायथ्याशी असलेल्या छत्रपती शिवाजी महाराज स्मारक परिसरात नव्याने बसविण्यात आलेल्या हायड्रॉलिक लिफ्टचे उद्घाटन करण्यात येणार आहे. या कार्यक्रमाला खासदार अमोल कोल्हे, आमदार शरद सोनवणे, माजी आमदार अतुल बेनके, आशा बुचके तसेच विविध मान्यवर उपस्थित राहणार आहेत. नगरपरिषदेचे पदाधिकारी व नगरसेवकही या सोहळ्यात सहभागी होणार आहेत. सायंकाळी 'शिवप्रताप सोहळा' या नाटकाचे आयोजन करण्यात आले असून त्यानंतर इतिहास अभ्यासक हभप संग्राम बापू भंडारे यांचे व्याख्यान होणार आहे. शिवराज्याभिषेक दिनाच्या निमित्ताने आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमांमध्ये मोठ्या संख्येने शिवप्रेमींनी सहभागी व्हावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.



## १०० वृक्षांचे रोपण, ४०० रोपांचे मोफत वाटप

मवेशी, ता. अकोले : (स. गांवकरी)




जागतिक पर्यावरण दिनानिमित्त "आम्ही पर्यावरण प्रेमी" समूहाच्या पुढाकारातून व ग्रामपंचायत मवेशीच्या सहकार्याने पोलीस प्रशिक्षण केंद्र, मवेशी येथे वृक्षारोपण व रोपवाटपाचा प्रेरणादायी उपक्रम राबविण्यात आला. यावेळी १०० वृक्षांचे रोपण करण्यात आले, तर ग्रामस्थ व महिलांना ४०० रोपांचे मोफत वाटप करण्यात आले.

पर्यावरण संवर्धनाची जबाबदारी प्रत्येकाने स्वीकारावी आणि गावागावांत हरित चळवळ उभी राहावी या उद्देशाने या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. वाढते तापमान, कमी होत चाललेले जंगलक्षेत्र आणि बदलते हवामान याच्या पार्श्वभूमीवर वृक्षारोपण व वृक्षसंवर्धनाचे महत्त्व यावेळी अधोरेखित करण्यात आले.

कार्यक्रमासाठी मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी तसेच माजी सैनिक व निसर्गप्रेमी रमेश रखमाळे यांची प्रेरणा लाभली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मवेशीचे सरपंच यमाजी भिवा भांगरे होते. गटविकास अधिकारी अमरजी माने, राजूर प्रकल्प अधिकारी यांचे विशेष सहकार्य लाभले. तसेच वनपरिक्षेत्र अधिकारी दत्तात्रय पडवळे, प्रा. नितीन तळपाडे, राष्ट्रसंत बाळासाहेब कोंडार महाराज, ग्रामविकास अधिकारी सौ. एस. डी. देशमुख यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते.

मार्गदर्शन करताना प्रा. नितीन तळपाडे यांनी पर्यावरणासोबतच भाषा व संस्कृती जपण्याचे महत्त्व विशद केले.

पर्यावरण संरक्षण ही काळाची गरज असून प्रत्येकाने किमान एक झाड लावून त्याचे संगोपन करावे, असे आवाहन यावेळी करण्यात आले.

"आम्ही पर्यावरण प्रेमी" समूहाचे अध्यक्ष राहुल राऊत यांच्या नेतृत्वाखाली रमेश लेंभे, दत्ता कोंडार, रोहित मुठे, संजय देशमुख, दत्ता लांघी, हेमा कोंडार, संजय भांगरे, रामदास भांगरे, मेजर भरत कांबळे, गोविंद बांगर, आनंदा देठे, नामदेव कोंडार, गवळी सर, माजी सरपंच सौ. कमल बांबळे, सुनिता कोंडार यांच्यासह ग्रामपंचायत पदाधिकारी, महिला बचत गट, शैक्षणिक संकुल मवेशीचे प्रतिनिधी, युवक, शेतकरी आणि पर्यावरणप्रेमी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. "एक झाड म्हणजे हजारो श्वासांचे दान" हा संदेश देत उपस्थितांनी वृक्षसंवर्धनाचा संकल्प केला. सूत्रसंचालन गवळी सर यांनी केले, तर आभार राहुल राऊत यांनी मानले.

## पारनेर ग्रामीण रुग्णालयात शवविच्छेदन प्रक्रियेतील दिरंगाई!

- आमदार दातेंनी घेतली गंभीर दखल

पारनेर (स. गांवकरी)

पारनेर तालुक्यातील हिवरे कोरडा येथील रमेश बाबासाहेब शेळके यांच्या निधनानंतर त्यांचा मृतदेह शवविच्छेदनासाठी पारनेर येथील ग्रामीण रुग्णालयात आणण्यात आला होता. मात्र तालुक्याचे मुख्य ठिकाण असलेल्या पारनेर ग्रामीण रुग्णालयात शवविच्छेदन प्रक्रियेस होत असलेल्या विलंबामुळे नातेवाईकांसह उपस्थित नागरिकांमध्ये तीव्र नाराजीचे वातावरण निर्माण झाले होते. प्रशासनाच्या उदासीनतेमुळे परिस्थिती अधिक गंभीर बनत असल्याची माहिती मिळताच पारनेर-नगर विधानसभा मतदारसंघाचे आमदार काशिनाथ दाते सर यांनी तातडीने ग्रामीण रुग्णालयात धाव घेत परिस्थितीची पाहणी केली.

सर्वसामान्य नागरिकांच्या अडचणीच्या वेळी तत्परतेने धाव घेऊन प्रशासनाला जबाबदारीची जाणीव करून देणारी आमदार काशिनाथ दाते सरांची कार्यशैली यावेळी पुन्हा एकदा दिसून आली. त्यांच्या तातडीच्या हस्तक्षेपामुळे संबंधित प्रक्रिया वेगाने मार्गी लागली असून उपस्थित नागरिकांनी समाधान व्यक्त केले. राष्ट्रवादी काँग्रेस तालुका उपाध्यक्ष प्रितेश पानमंद यावेळी उपस्थित होते. जनतेच्या प्रश्नांवर तत्काळ प्रतिसाद देणे आणि प्रशासनाला जबाबदार धरणे, हीच आमदार काशिनाथ दाते सर यांच्या लोकाभिमुख नेतृत्वाची खरी ओळख असल्याची भावना यावेळी नागरिकांमधून व्यक्त करण्यात आली.



पारनेर ग्रामीण रुग्णालय पोहोचल्यानंतर उपस्थित नातेवाईक व नागरिकांशी संवाद साधून त्यांची व्यथा जाणून घेतली, त्यानंतर पारनेर ग्रामीण रुग्णालयाचे प्रभारी वैद्यकीय अधिक्षक डॉ. सतीश लोंढे यांना शवविच्छेदन करण्यात विलंब झाल्याबद्दल जाब विचारला, जिल्ह्याचे शल्य चिकित्सक डॉ. संजय घोगरे यांच्याशी दूरध्वनीवरून त्वरित संपर्क साधत संबंधित शवविच्छेदन प्रक्रिया कोणत्याही विलंबाशिवाय पूर्ण करण्याचे निर्देश दिले. तसेच अशा संवेदनशील प्रकरणांमध्ये नागरिकांना तासन्तास प्रतीक्षा करावी लागणे ही गंभीर बाब असून, आपल्या कर्तव्यात कुचराई करणाऱ्या संबंधित कर्मचाऱ्यांवर योग्य ती चौकशी करून कारवाई करण्यात यावी, अशा स्पष्ट सूचनाही दिल्या.

**- आ. काशिनाथ दाते सर, (विधानसभा सदस्य)**

## उद्यान गेट व परिसर बनला गोंधळ घालण्याचे ठिकाण

सोलापूर : (स. गांवकरी)



न्यू बुधवार पेठ येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर उद्यानाचे मेन गेट व उद्यानाचा परिसर म्हणजे रात्री उशिरा पर्यंत दारू पिऊन गोंधळ घालण्याचे आणि आरडा ओरड करण्याचे व टवाळखोर आणि दारुडे व गर्दुल्ले लोकांचे व गुन्हेगार लोकांचे महत्वपूर्ण आणि सोयीचे ठिकाण बनले असुन याकडे पोलिस आयुक्त यांनी जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले आहेत. डॉ बाबासाहेब आंबेडकर उद्यान परिसर हा पवित्र परिसर स्वच्छ आणि शांत परिसर रहावा म्हणून येथील काही सामाजिक कार्यकर्ते नेहमीच प्रयत्नशील आहेत. परंतु त्यांच्या या चांगल्या प्रयत्नांना दारुडे, टवाळखोर व्यक्ती आणि अवैध धंदे वाले व चोर यांच्याकडून रोजच्याच रात्री होणाऱ्या गोंधळामुळे मोठ मोठ्याने ओरडण्यामुळे गोंधळ घालण्यामुळे आणि रात्री दररोजच वाढदिवसाचे फटाके फोडून शांतता भंग करण्याचे प्रकार घडत असल्यामुळे खीळ बस्ता असून या बाबतीत अनेक वेळा जोडभावी पोलिस ठाण्याच्या अधिकाऱ्यांना आणि खुद्द पोलिस आयुक्त यांना सांगून ही कोणीच यावर निर्बंध आणण्यासाठी कायद्याचा वापर करत नसल्यामुळे येथील रहिवाशी नागरिकांचे जिने हराम झाले असून दररोजच गोंधळ गोंगाट आरडा ओरड, धिंगणा घालणे, मोठमोठ्याने चीरकणे, अशा गोष्टींमुळे रहिवाशी नागरिक मोठ्या प्रमाणात त्रस्त झाले आहेत.

# आदिला नदीच्या रेखांकनाला स्थगिती मिळावी अन्यथा तीव्र आंदोलन करणार

सोलापूर : (स. गांवकरी)

सोलापूर मध्ये मानवी लोकसंख्या वाढून नदी पात्रातील जागेवर अतिक्रमण केल्यामुळे नष्ट झालेल्या अदिला नदी च्या रेड-ब्ल्यू लाईन रेखांकनाला तत्काळ स्थगिती देण्यात यावी अशी मागणी अदिला नदी बचाव कृती समितीने केली आहे जर यापुढे नदीचे रेड ब्लू लाइन रेखांकन करण्याचा प्रयत्न झालाच तर हा प्रयत्न हाणून पाडला जाईल असा इशारा ही नदी बचाव कृती समितीने दिला आहे. रेड ब्लू लाइन रेखांकनामुळे सुमारे १२०० एकर जमीन, २०० गट, ७५० बांधकामे बाधित होण्याची भीती असून यामुळे जनतेचे रहिवाशी क्षेत्राचे मोठे नुकसान होणार आहे. सोलापूर महानगरपालिकेकडून आपत्ती व्यवस्थापन कायद्यांतर्गत प्रस्तावित करण्यात आलेल्या आदिला नाल्याच्या रेड लाईन व ब्ल्यू लाईन रेखांकनाला तीव्र विरोध दर्शविला आहे. या रेखांकनामुळे शेळगी ते बसवेश्वर नगर परिसरातील सुमारे १२०० एकर जमीन, २०० गट, ७५० बांधकामे तसेच हजारो प्लॉटधारक व घरमालक बाधित होणार असल्याने प्रस्तावित रेखांकन प्रक्रिया तातडीने स्थगित करावी अन्यथा पुढील १५ दिवसांत व्यापक जनआंदोलन छेडण्याचा इशारा अदिला नाला कृती समितीने पत्रकार परिषदेत दिला आहे. महानगरपालिकेने रेड-ब्ल्यू लाईन रेखांकनाऐवजी प्रथम आदिला नाल्याची संपूर्ण सफाई, खोलीकरण आणि रुंदीकरण करणे गरजेचे आहे. ज्या ठिकाणी अनधिकृत भराव, बेकायदेशीर पूल अथवा अतिक्रमणामुळे नाल्याचा प्रवाह रोखला गेला आहे, तेथील अडथळे हटवून नाल्याची मूळ वाट पूर्ववत करावी. २०२५ मध्ये हिप्परगा तलावातील अतिरिक्त पाण्याचा विसर्ग झाल्यानंतर नाल्यालगतच्या काही भागांत पाणी साचल्याचा संदर्भ देत समितीने प्रशासनावर दुर्लक्षाचा आरोप केला. पाटबंधारे विभागाने पूर्वसूचना देऊनही नालेसफाई व उपाययोजना न केल्याने ही परिस्थिती निर्माण झाल्याचा आरोप केला आहे.

रेड-ब्ल्यू लाईन रेखांकन लागू झाल्यास विकसित निवासी भाग, मंजूर लेआऊट, अपार्टमेंट प्रकल्प, प्लॉटिंग स्कीम आणि सुरू असलेल्या बांधकामांवर निर्बंध येतील, त्यामुळे सामान्य नागरिक, शेतकरी, बिल्डर आणि गुंतवणूकदारांचे मोठे आर्थिक नुकसान होईल, अशी भूमिका समितीने मांडली. सोलापूर शहर विकास आराखडा २०२४-२०४३ नुसार बांधकाम परवानग्या पूर्ववत कराव्यात, तसेच पूर्वी मंजूर केलेल्या परवानग्या कायम ठेवाव्यात, अशी मागणीही यावेळी करण्यात आली. खासदार, आमदार तसेच सुमारे ५० नगरसेवकांचा पाठिंबा असल्याचा दावा समितीने केला असून आंदोलनाची दिशा व तारीख लवकरच जाहीर केली जाणार असल्याचे सांगण्यात आले.

आदिला नाल्याची सोलापूर शहरातील प्रवाह लांबी सुमारे १२ कि.मी. असून, हिप्परगा तलावातील एकरुख उपसा सिंचन योजनेचे अतिरिक्त पाणी या नाल्यामार्गे सीना नदीत मिसळते. हा हंगामी नाला असून त्यामध्ये बारामाही पाणी वाहत नाही. २०२५ मध्ये हिप्परगा तलाव पूर्ण भरल्यानंतर अतिरिक्त पाण्याचा विसर्ग झाला; मात्र नाल्यातील अतिक्रमणे, बेकायदेशीर पूल, भराव तसेच कमी झालेली खोली व रुंदी यामुळे पाणी नाल्याबाहेर पसरले.

प्रत्यक्ष सर्वेक्षणात अनेक ठिकाणी नाल्याचे पात्र मूळ नकाशांपेक्षा अरुंद व उथळ झाल्याचे दिसून आले. तरीही या घटनेत कोणतीही जीवितहानी, पशुहानी किंवा मालमत्तेचे नुकसान झाले नाही. असे असताना प्रशासनाने याला पूरस्थितीचे स्वरूप देत आपत्ती व्यवस्थापन कायद्यांतर्गत रेड-ब्ल्यू लाईन रेखांकन प्रक्रिया सुरू केल्याचा आरोप कृती समितीने केला. विकसित भागात रिस्ट्रीक्टेड झोन लागू झाल्यास हजारो नागरिक, प्लॉटधारक व बांधकाम प्रकल्प अडचणीत येतील. त्यामुळे प्रथम नाल्याची सफाई, अतिक्रमण हटविणे, पात्र ६ मीटर रुंद व ५ मीटर खोल करणे तसेच संरक्षण भिंत उभारणे आवश्यक आहे.

### या आहेत प्रमुख मागण्या

- रेड-ब्ल्यू लाईन प्रक्रियेला स्थगिती द्यावी
- नाला ६ मीटर रुंद, ५ मीटर खोल करण्याची मागणी
- अतिक्रमण हटवून नाल्याचा प्रवाह पूर्ववत करणे
- पूर्वीच्या बांधकाम परवानग्या कायम ठेवा
- रेखांकनाऐवजी नालेसफाई, खोलीकरण व रुंदीकरण करावे
- निर्णय मागे न घेतल्यास मोठ्या जनआंदोलनाचा इशारा देण्यात आला आहे.